|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ अंक : १० रविवार दि. २५ फेब्रुवारी २०२४ ते रविवार दि. ०३ मार्च २०२४ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

सत्तेचा माज चढताच कार्यकर्ते उन्मत्त झाले शिंदे गटाच्या गुडांनी विद्यार्थ्याला ठार केले | ३
ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान | ४
संतप्त महिलांचा गटविकास अधिकारी कार्यालयात हंडा कळशीसह ठिय्या आंदोलन | ५
देवणी तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते शरदचंद्र पवार साहेबांच्या विचारांचे! | ७
मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात ९४५ नवीन पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती! | ८



अजिंठ्याच्या कुशीतून उगम पावणारी ही वाघूर नदी. वाकोद या भाऊंच्या जन्मगावी प्रवाहित झालेली. श्रद्धेय मोठ्याभाऊंप्रती नितांत आदर भावना व्यक्त करणारी ही आशयसंपन्न रचना साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त श्रीकांत देशमुख यांची. *(रचना : २००६, जळगाव)*

## भाऊ

‘वाघुर’च्या खोऱ्यामधी,
तुवा टेकविला माथा ।
हातापायाच्या रेघात,
घोळविली गावगाथा ।।

तुझ्या मनातली नाती,
तुझ्या पायतळी माती।
दऱ्याखोऱ्यात हासली,
गर्द गवताची पाती ।।

भंडाऱ्याच्या डोंगरात,
तुकोबाही अभंगला ।
तुझ्या हाकेच्या पोटात
तुकाराम प्रसवला ।।

स्वता होऊनि जाणता,
नेणत्याला दिले बळ ।
काबाडल्या देहावरी,
पाठीलागी आले वळ ।।

माती रडे ढेकळात,
गाव कापे काळजात ।
जन्म जगता मरता,
हरवली देहकात ।।

उन्हे झेलता पेलता,
कातळला देहमाथा ।
शेतकीला दिले बळ,
असा माणूस जाणता ।।

तुझ्या नसानसातून वाहे,
वाघुरचे निळे पाणी ।
भावभोळ्या माणसांची,
तुझ्या ओठी देवगाणी ।।

नदीकाठ रुंदावला,
जरीकाठाचा पदर ।
जशी नाथाच्या हातची,
तुवा घेतली कावड ।।

कावडीत भरलेले,
अजिंठ्याचे निळे पाणी ।
घेते झेलून आभाळ
काळ्या मातीची कहाणी ।।

*— श्रीकांत देशमुख*

**श्रद्धेय भवरलालजी जैन यांना श्रद्धावंदनदिनी कृतज्ञतापूर्वक प्रणाम...**

*जन्म : १२ डिसेंबर १९३७ निर्वाण : २५ फेब्रुवारी २०१६*

भवरलाल अँण्ड कांताबाई जैन फाउंडेशन www.bkjfoundation.org
कांताई नेत्रालय ॲडव्हान्स्ड आय केअर
जैन स्पोर्ट्स अकॅडमी आरोग्य. आत्मनिर्भर. अभेद्यता.
भाईसाहेब सुंदरलाल मल्हारा पोटेन्शियल डेव्हलपमेन्ट अकॅडमी
जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी. www.jains.com
भवरलालजी आणि कांताई जैन परिवार www.bhavarlaljain.in
जैन फार्म फ्रेश फुड्स् लि. मस्त चवीमागचं तुमचं पाककौशल्य. www.jainfarmfresh.com
अनुभूति स्कूल www.anubhutischool.in
गौराई कृषी-तंत्र निकेतन
बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्ट
गांधी रिसर्च फाउंडेशन • सत्य • अहिंसा • शांती www.gandhifoundation.net

25 FEBRUARY TO 03 MARCH 2024 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 2/24/2024 8:38 PM Page 1



पान ३ वरून...

## सत्तेचा माज चढताच कार्यकर्ते ...

त्याचे वडील कैलास आणि त्याच्या इतर साथीदारांनी संकेतचे अपहरण केले. मारहाणीनंतर त्याला बेशुद्ध अवस्थेत फेकण्यात आले. गंभीर जखमी संकेतवर मुंबईतील रुग्णालयात उपचार सुरू असताना बुधवारी त्याचा मृत्यू झाला. आरपीआय आठवले गटाचे शहराध्यक्ष महेंद्र गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत कैलास आणि त्याचे साथीदार दोन-तीन वाहनांतून आल्याचा आरोप केला. त्यांनी संकेतला वराला देवीकडे नेले, त्याला अंमली पदार्थ पाजले आणि मारहाण केली. रक्तस्राव होऊ नये म्हणून त्याच्या डोक्यावर रबर पाईपने वार करण्यात आले. यामुळे तो बेशुद्ध झाला. शुद्धीवर आल्यानंतर त्याला पाणी पाजले आणि मारहाण करण्यात आली. संकेत याच्यावर वाहन चढवल्याने त्याचे दोन्ही पाय फ्रॅक्चर झाल्याचा आरोप महेंद्र व मृताच्या अन्य नातेवाईकांनी केला आहे. हल्लेखोरांनी त्याला बेशुद्ध अवस्थेत लॉट्स हॉस्पिटलमध्ये नेले, पण तिथल्या डॉक्टरांनी त्याची गंभीर स्थिती पाहून त्याला दाखल करण्यास नकार दिला. यानंतर आरोपींनी त्याला तिथे फेकून तेथून पळ काढला. कुटुंबीयांनी अडीच तास त्याचा शोध घेतला आणि बेशुद्ध अवस्थेत मुंबईतील केईएम रुग्णालयात दाखल केले. कुटुंबीयांनी कैलासला जाऊन अपहरणाबद्दल विचारले असता त्याने ते नाकारले, असा आरोप महेंद्र गायकवाड यांनी केला आहे. संकेतच्या कुटुंबीयांनी सांगितले की, अपहरणानंतर तो त्याचा जीव वाचवण्यासाठी पोलिस ठाण्यात धाव घेत होता. मात्र, पोलिसांनी ही घटना आपल्या परिसरात घडली नसल्याचे सांगून टाळाटाळ केली. त्यामुळे कुटुंबीयांनी भिवंडी शहर पोलीस ठाणे ते नारपोली पोलीस ठाणे दरम्यान सुमारे अडीच तास चक्काजाम केला. पोलिसांनी वेळीच कारवाई केली असती तर संकेतचा जीव वाचू शकला असता, असा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या हत्येच्या निषेधार्थ शुक्रवारी मोर्चा काढण्यात येणार असल्याचं महेंद्र गायकवाड यांनी सांगितले. या घटनेबाबत आपण भिवंडी शहर पोलीस ठाण्यात गेलो असता वरिष्ठ पोलिस निरीक्षकांनी आपल्यावर दबाव आहे, त्यामुळे आपण कोणतीही मदत करू शकणार नसल्याचे सांगितले. एसीपींकडे गेले असता त्यांनी याबाबत काहीच माहिती नसल्याचे सांगितले. पोलिसांच्या संशयास्पद भूमिकेवर त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## जमिनीच्या वादातून सुनेचे डोके...

नणंदेची वाटणी दिली तर ती सासु सखुबाई यांना घरात ठेवून घेण्यास ही नकार दिला. हा वाद इतका विकोपाला गेला की, साखुबाई या पारे येथे मुलगी आणि जावयाकडे राहयला येवू लागल्या. तेथून सखुबाई आणि मुलगी संगिता या दोघी सतिश याला कुणालच्या नावे जमीन करण्यास सांगू लागल्या. सतिश याने ही विरोध न करता पत्नी रेणुका आणि मुलगा अशिष यांना न विचारताच त्या दोघींच्या सांगण्यावरून संगिता सांळुखे हिचा जावाई कुणाल याच्या नावे जमीन करण्याचा कागद तयार केला. काही कायदेशीर बाबीची पुर्तता झाल्यावर संगिता हिच्या हिस्साची जमीन कुणाल पाटील याच्या नावे होणार होती. ही गोष्ट रेणुका हिला समजताच तिने सासु सखुबाई आणि नणंद संगिता याच्याबरोबर भांडण उकरून काढून त्या दोघींना ही तिने धमकी दिली. कुणालच्या नावे केलली जमीन परत फिरवून दया नाहीतर तुमचे काही खरे नाही असे तिने त्या दोघींना सांगितले.परंतु सखुबाई यांनी सून रेणुका हिला माझ्या मुलीच्या वाटणीची जमीन मी तिच्या जावायच्या नावे करणार आहे.त्यात तुझा काहीच संबंध नाही असे ठणकावून सांगितले.रेणुकाने तर सासु सखुबाईला विटा येथील आपल्या घरी राहण्यास ही मज्जाव केला होता. त्यामुळे त्या मुलगी संगिता हिच्या पारे येथील शिवअमृत येथे राहु लागल्या. पती सतिश निकम हा व्यवसायच्या निमित्याने वेगवेगळया शहरात फिरत असल्याने पत्नी रेणुका हिने आईला आणि बहिणीला दिलेली धमकी त्याला माहित नव्हती. घरातील वाद विकोपला गेलेत एवढेच त्याला माहित होते. घरी असताना तो पत्नी रेणुका आणि मुलाचे समजूत काढत होता. परंतु रेणुका ही नणंदेच्या जावायच्या नावे केलेली मालमत्ता परत घ्या असे तगादा ती त्याच्या मागे लावीत होती. कधी कधी तर आपल्या नवऱ्याला सासु आणि नणंदेनेच कामाला लावले आहे असे तिला वाटत होते. त्यामुळे ती त्या दोघीचा रागा राग करीत होती. घरात आई वडिलांचे या कारणातून होत असलेली भांडणे मुलगा अशिष आणि त्याचा लहान भाऊ यांना समजत होते. त्या दोघांना ही आईचेच म्हणणे पटत होते. आपल्या आईची बाजु खरी आहे असे त्यांना ही वाटत होते. आपले वडिल हे आजीच्या आणि आत्तीच्या सांगण्याला बळी पडले आहेत त्यामुळे भांडणात ते दोघे ही आपल्या आईची बाजु घेत होते. घरातील वाद विकोपाला गेल्यावर रेणुका हिने मुलगा अशिष आणि दुसरा अल्पवयीन मुलगा या दोघांना घेऊन तिने सोमवार दि.१९ फुेब्रवारी रोजी पारे येथील आपल्या नणंदेचे घर गाठले. त्यावेळी तिने आपली सासु हिला जावाई कुणाल याच्या नावे केलेली जमीन परत फिरवून घ्या नाही तर तुम्हाला सोडत नाही अशी धमकी देत त्या दोघीच्या बरोबर जबरदस्त भांडण केले. त्यानंतर त्या दिवशी ते तिघे ही परत आपल्या विटा येथील घरी आले. पत्नीची आणि मुलांची ही गोष्ट सतिश यांना माहित नव्हती. त्या तिघांनी सोमवार रात्री वेगळाच प्लॅन केला. त्यांनी ठरविलेल्या प्लॅनप्रमाणे परत ते तिघे ही मंगळवार दि.२० फेब्रुवारी रोजी परत पारे गाठले. त्यांनी नणंदेच्या घरात जावून जोरदार भांडणे काढली. भांडणात अशिषने तर कुणाल आणि आती संगिता सांळुखे यांना जबर मारहाण केली. त्यावेळी सखुबाई या भांडण सोडवायस गेल्या असता सुन रेणुका हिने तिला मारहाण करीत म्हतारे थेरडे हे सगळे तुझ्यामुळे झाले आहे म्हणत त्यांना आतील खोलीत ओढत नेले. बरोबर अशिष आणि लहान मुलगा हे होतेच. आतील खोलीत सखुबाई यांना ओढत नेल्यावर त्या तिघांनी त्या रुमचा दरवाजा आतून बंद केला. रेणुका हिने वृध्द सासु सखुबाई यांना बेडवर खाली पाडून ती त्याच्या अंगावर बसली त्याचवेळी अशिष आणि त्याच्या लहान भावाने आजी सखुबाई हिच्या गळ्याभोवती टॉवेल टाकला. रेणुका हिचा राग तर अनावर झाला होता. ती आपल्या दोघा मुलांना चिथावणी देत मार थेरडीला हिच्यामुळे तर सगळे होत आहे म्हणत टॉवेलने गळा जोरात आवळण्यास सांगितले. त्यावेळी तिने ही सासुचा गळा जोरात आवळून धरला.इकडे दोन्ही मुलांनी टॉवेलचा फास जोरात आवळ्याने सखुबाई यांचा श्वास गुदमरत जावून मंदावला.त्याच वेळी बाहेरून दार उघडा असे संगिता तिचा नवरा रामचंद्र, मुलगी जावाई कुणाल ओरडत होते. परंतु त्यांनी त्याचा आवाज न ऐकल्या सारखे करीत सासुला मारून टाकले.सासुला मारल्यावर रागाच्या भरात रेणुका हिने दरवाजा उघडत मेली एकदाची असे म्हणत चला रे म्हणत दोन्ही मुलांना घेऊन तेथून तिने पोबारा केला. ते तिघे ही तेथून गेल्यावर संगिता हिने आईला बघून हंबरडा फोडला. घरात रडारडी सुरू झाली. या घटनेची माहिती शेजारच्या लोकांना समजताच त्यांनी त्याच्या घरी धाव घेतली. संगिता सांळुखे या रडून रडून आपल्या आईला वहिनीने आणि तिच्या मुलांनी मारल्याचे सांगू लागली. या घटनेची माहिती कुणी तरी विटा पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी घटनास्थळी ठेस तज्ञांना ही पाचारण केले. पंचनामा सुरू असताना ही घटना कोणत्या कारणातून आणि कुणी केली आहे याची माहिती पोलीसांना मिळाली होती. पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी विटा येथील सरकारी रुग्णालयात पाठून दिला. या घटनेतील संशयीत रेणुका निकम तिचे मुले हे विटा येथील आपल्या घरी असल्याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर पोलीसांनी त्यांना तेथून ताब्यात घेतले. त्यांना विटा ग्रामीण पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्या तिघांनी ही आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलिसांना दिली. या घटनेची फिर्याद मयत सखुबाई याची मुलगी रेणुका सांळुखे हिने विटा ग्रामीण पोलीसात दिल्याने त्याच्या फिर्यादीवरून पोलिसांनी सखुबाई संभाजी निकम (वय ८०) हिच्या खुन प्रकरणी त्याची सुन रेणुका सतिश निकम (वय ४४) तिचा मुलगा अशिष (वय १९) आणि एक अल्पवयीन मुलगा याच्या विरोधात विटा ग्रामीण पोलीसात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला. त्या तिघांना ही पोलीसांनी विटा येथील न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने त्यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्यांच्याकडून गुन्हयात वापरेला टॉवेल जप्त केला. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपाधिक्षक विपुल पाटील याच्या मार्गदर्शनाखाली पो.निरी. शरद मेमाणे हे करीत आहेत. सासु आणि सुन याचे कधीच एकमेकींशी पटत नाही असे म्हणतात ते बरोबरच आहे. त्यातच नणंदेच्या बाजुने सासु राहिली तर तीचा जळफळाट होतो. सासुने नणंदेला मालमत्तेचा हिस्सा दिला तर ती आणखीनच चिडते आणि रागाच्या भरात नको ते करून बसते हेच या घटनेवरून दिसून येते.

## प्रेयसीच्या प्रेमात अखेर प्रियकर ...

हे सर्व कळल्यानंतर घरात वाद झालेआणि काही महिन्यातच अहमदनगर जिल्ह्याच्यानेवासा तालुक्यातील वरखेड येथील विशाल उर्फ ईश्वर उर्फ राजू याच्याशी तिचे लग्न लावून देण्यात आले. अश्विनी तिच्या संसारात रममाण झाली. तिला दोन मुले झाली. बीड जिल्ह्यातील पुरूषोत्तमपुरी येथेही तसेच घडले. रामेश्वर कोरडेचे लक्ष अभ्यासात लागेना. तो ड्रायव्हींग शिकला. इतरांच्या गाड्यांवर तो ड्रायव्हर म्हणून काम करायचा. एक चांगलं स्थळ बघून त्याच्या घरच्यांनी त्याचे लग्न करून दिले. तोही संसारात रमला, मात्र त्याचा अश्विनीशी संपर्क चालूच होता. अधून-मधून तेएक दुसऱ्याला फोन करून एकमेकांच्या संपर्कात होते. एकदा विवाह झाल्यावर त्यांनी आपल्या जोडीदाराशी प्रामाणिक रहायला हवे होते, मात्र तसे काही घडले नाही. ज्या-ज्या वेळेस शक्य होईल तेंव्हा रामेश्वर हा अश्विनीला संपर्क करत असे. त्यावेळी तो कुठलाही विचार करत नसे. यामुळे आपल्यावर काय संकट ओढवू शकते याचाही त्याने विचार केला नाही. रामेश्वर कोरडे अश्विनीचा पिच्छा सोडायला तयार नव्हता. जाता-येता तो तिची गाठ- भेट घेत असे. हेही लपून राहिले नाही. हे प्रकरण तिच्या घरच्यांना समजले, तसे वातावरण तंग बनले. आपल्या मुलीच्या संसारात तो विष कालवू पहातो अशी तिच्या पालकांची भावना झाली, त्यामुळे त्याला चांगलाच धडा शिकवायचा असे अश्विनीच्या भावाने ठरवले. एप्रिल २०२३ मध्ये अश्विनीचा भाऊ अविनाश घटे याने रामेश्वरचे अपहरण करून त्याला बेदम चोप दिला. याबाबत नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अधून-मधून या घटना घडत होत्या. त्यावेळी अविनाश घटे व त्याच्या तीन-चार मित्रांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. धाकदपटशा करून तरी रामेश्वरमध्ये सुधारणा होईल अशी अपेक्षा अश्विनीच्या घरच्यांची होती, मात्र एवढे घडूनही त्याच्यात सुधारणा होत नव्हती. वडील रामचंद्र, आई लता, पत्नी सीमा व दोन मुले अशा सर्वांची जबाबदारी आता - रामेश्वरवरच होती. त्याच्याकडे वडीलोपार्जित शेतीही होती, मात्र ड्रायव्हींगची आवड असल्याने वडीलांनी त्याला नवीन पिकअप गाडी घेवून दिली होती. पिकअप गाडीच्या बांधणीचे काम करायचे असल्याने रामेश्वर आपले वडील रामचंद्र (वय ५५) यांच्यासोबत दि. २ डिसेंबर २०२३ रोजी सकाळीच नाशिक येथे गेला होता. पिकअप गाडी बांधणीसाठी टाकली होती. गाडीचे काम काही लगेच झाले नाही, त्यामुळे ते दोघे बाप-लेक नातेवाईकांकडे मुक्कामाला थांबले. गाडी बनवण्यासाठी पैसे कमी पडल्याने रामेश्वर दुसऱ्या दिवशी दि. ३ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ६ वाजता पैसे आणण्यासाठी बीड येथे जाण्यासाठी नाशिक येथील नातेवाईकांची मोटरसायकल घेवून निघाला. त्यानंतर दुपारी २ वाजण्याच्या सुरास रामेश्वरचात्याचे वडील रामचंद्र यांना फोन आला. फोनवर त्याने सांगितले की, 'मी पैसे घेवून निम्म्या वाटेत आलो आहे. लगानंतरही रामेश्वर अश्विनीच्या संपर्कात असल्याने तो नाशिक अथवा इतरत्र कुठेही जाता-येता नेवासा इथे थांबल्याशिवाय रहात नसे. आजही बीडहून पैसे आणण्याच्या बहाण्याने नेवासा येथे तो घुटमळला होता. अश्विनीच्या संपर्कात असतांना त्याला अश्विनीचा भाऊ, त्याचा मित्र आणि अश्विनीच्या नवऱ्याने गाठले होते. दुपारी २ वाजण्याच्या सुमारास रामेश्वरचा फोन झाल्यानंतर त्याच्या वडीलांना दुपारी ४ वाजता मोबाईलवरून फोन आला. फोनवरील व्यक्ती बोलत होती. 'मी अविनाश घटे बोलतोय. आम्ही तुमच्या मुलाला नेवासा येथे पकडले आहे.' रामेश्वरचे वडील त्याला म्हणाले, 'तुम्ही त्याला का पकडले?' तेंव्हा तो म्हणाला, तुमचा मुलगा रामेश्वर माझी बहीण अश्विनीला भेटण्यासाठी आला होता, म्हणून आम्ही त्यास पकडून ठेवले आहे. त्यास आम्ही इंदापूर येथे घेवून जात आहोत. तुम्ही इंदापूर येथे थांबा.' असे म्हणून तो फोन ठेवणार, तेवढ्यात रामेश्वरचे वडीलत्याला म्हणाले, 'तू त्यास एवढ्या लांब घेवून जावू नका. मी एवढ्या लांब येऊ शकत नाही.' तेंव्हा त्या लोकांनी रामेश्वरच्या वडीलांना नेवासा येथे येण्यास सांगितले. हे बोलणे संपल्यानंतर रामचंद्र कोरडे (वय ५५) नाशिक येथे असलेल्या त्यांच्या नातेवाईकासोबत मोटरसायकलवरून नेवासा येथे जाण्यास निघाले. यावेळी रामचंद्र कोरडे यांनी याआधी आलेल्या मोबाईलवर कॉल केला, तेव्हा तो कॉल रिसीव्ह केला गेला. त्यावेळी रामचंद्र कोरडे यांना आरडा-ओरडा आणि विव्हळण्याचा आवाज ऐकू येवू लागला. त्यावेळी रामचंद्र कोरडे यांनी सांगितले की, माझ्या मुलाला मारहाण करु नका.तेंव्हा समोरच्या आवाज आला, तो म्हणाला की, 'मी अश्विनीचा पती विशाल बिरुटे आहे. तुमचा मुलगा माझ्या पत्नीस भेटायला आला.' त्याचवेळेस एका महिलेचाही आवाज त्यांना आला. ते सर्व जण त्यास मारहाण करत असल्याचे रामचंद्र कोरडे यांना जाणवले. दरम्यान पलिकडून आवाज आला. 'आम्ही त्यास मारहाण करत नाही, त्यास आम्ही सोडून देत आहे' असे त्यांनी सांगितले. ते बोलत असतांनाच आजूबाजूला इतर लोकांचादेखील आवाज फोनमधून येत होता. रामचंद्र कोरडे यांनी त्यानंतर अविनाश याच्या मोबाईलवर फोन केले. परंतु त्यांनी रामेश्वर कोठे आहे? याबाबत माहिती दिली नाही. कोरडे यांनी संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास अविनाश यास फोन लावला असता त्याने सांगितले की, 'आम्ही तुमच्या मुलास सोडून दिले आहे.' त्यानंतर संध्याकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास दुसऱ्या नंबरवरून फोन आला. त्या व्यक्तिने सांगितले की, 'याठिकाणी तुमचा मुलगा पडला आहे, त्यास मार लागलेला दिसत असून तो बेशुद्धावस्थेत आहे' हे ऐकून कोरडे यांनी त्यांना सांगितले 'तुम्ही पोलिसांना कळवा. मी नाशिक येथून येत आहे.' रामचंद्र कोरडे व त्यांचे नातेवाईक रात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास नेवासा पोलीस ठाण्यात आले. त्यांनी ठाणे अंमलदाराकडे मुलगा रामेश्वरविषयी चौकशी केली असता त्यावेळी त्यांनी त्याला साईसेवा हॉस्पिटल नेवासा फाटा येथे दाखल केल्याचे सांगितले. रामचंद्र कोरडे व नातेवाईक नेवासा फाटा येथील साईसेवा हॉस्पिटलमध्ये गेले असता, त्याठिकाणी रामेश्वरवर उपचार सुरू होते, मात्र त्याची परिस्थिती गंभीर होती. त्याला बराच मार लागलेला होता. त्याच्यावर उपचार सुरू असतांनाच दि. ४ डिसेंबर २०२३ रोजी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारासतेथील डॉक्टरांनी रामेश्वरचा मृत्यू झाल्याचे सांगितले. नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवाजी डोईफोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर थोरात यांनी पुढील उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह नेवासा फाटा येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवला.दरम्यान रामचंद्र किसन कोरडे (वय ५५) यांच्या फिर्यादीवरून ठाणे अंमलदार उपनिरीक्षक संदीप ढाकणे यांनी अविनाश सुरेश घटे (वय ३१), विशाल उर्फ ईश्वर उर्फ राजू बिरुटे (वय २९) अश्विनी ईश्वर बिरुटे (वय २५) आकाश दत्तात्रय कोकाटे (वय ३४) यांच्याविरुद्ध गुन्हा रजि. नं. ११२/२०२३ भा.दं.वि. ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक शिवाजी डोईफोडे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर थोरात, उपनिरीक्षक मनोज मुंडे, पोलीस नाईक अशोक लिपणे, कॉन्स्टेबल सुमित करंजकर, समीर शेख यांनी तपासास सुरुवात केली. या तपासात सर्व काही निष्पन्न झाले. संधी मिळेल त्यावेळी अश्विनीला भेटायला येणारा रामेश्वर दि. ३ डिसेंबर २०२३ रोजी सायंकाळी नेवासाजवळील औंदुबर हॉटेल ते नेवासा या रस्त्याजवळील भागात आला होता. नेवासा ते खडका फाटा जुना औरंगाबाद रोडवरील ज्ञानमोहिनी नगरच्या प्लॉटींग क्षेत्रात तो आला होता. अनेकदा सांगूनही तो ऐकत नाही म्हणून आता त्याला सोडायचे नाही अशी मानसिकता अश्विनीचा भाऊ अविनाश घटे, नवरा ईश्वर बिरुटे यांची झाली होती. रामेश्वर कोरडे याच्याशी सुरुवातीला अश्विनीचा भाऊ अविनाश घटे, नवरा ईश्वर बिरुटे, घटेचा मित्र आकाश कोकाटे याने शिवीगाळ केली. त्याला बरेचसे सुनावले, अन् संतापाच्या भरात त्यांनी एका मोठ्या लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. त्याचवेळी अविनाश घटे व रामेश्वरच्या वडीलांचा फोन चालू होता. तो आवाज फोनमध्ये येत होता. हे सर्व अश्विनीसमोर पडत होते. तो निपचित होवून पडल्यावर ते निघून गेले. नेवासा पोलिसांना कोणीतरी कळवल्याने पोलिसांनी रामेश्वरला साईसेवा हॉस्पिटलमध्ये दाखल केले. रामचंद्र कोरडे यांनी फिर्याद दिल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर थोरात यांनी जलदगतीने तपास करून अविनाश घटेला दि. ७ डिसेंबर २०२३ रोजी ईश्वर बिरुटे व अश्विनी बिरुटे यांना दि. ४ डिसेंबरलाच तर त्यांचा मित्र आकाश दत्तात्रय कोकाटेला दि. १९ डिसेंबर रोजी जेरबंद केले. या सर्व आरोपींनी गुन्हा कबुल केला. सध्या सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर थोरात करत आहेत.

## मित्राने मैत्रीचा धर्म नाही...

आपल्या बायकोला बाहेर घेऊन जातो तिच्याबरोबर मजा मारतो त्यावेळेपासून त्या दोघा नवरा बायकोत दररोज भांडणे होऊ लागली. यासीन हा कामावरून रोज घरी येताना दारू पिऊनच येऊ लागला. भांडणात तो बायकोला शरीफ बरोबरचे संबध तोडून टाक, त्याला जवळ घेऊ नकोस असे सांगत होता. ती मात्र त्याचे काहीच ऐकत नव्हती. उलट ती नवऱ्यालाच तु माझ्या लायकीचा नाहीस असे म्हणून हिणवू लागली. याचा भयंकर राग यासीनला येत होता. शरीफमुळे माझ्या घराची वाट लागली आहे असे तो म्हणत होता. काही केल्या त्याची बायको शरीफचा नाद सोडयला तयार नव्हती. त्यातच मागे एकदा घरी कुणी नसताना यसीनला त्याची बायको आणि शरीफ हे दोघे नको त्या अवस्थेत सापडले. त्यावेळी तर त्याच्या रागाचा पारा जास्तच चढला. त्यातून ही त्याने एकदा दोनदा शरीफ याला भेटून तु माझ्या बायकोचा नाद सोड तिला तुझ्या नादाला लावू नकोस त्याचे परिणाम गंभीर होतील अशी धमकी दिली. त्या धमकीकडे शरीफने जाणून बुजून दुर्लक्ष केले. शरीफने आपल्या बायकोला नादाला लावून आपली बदनामी केली आहे, त्याच्यामुळे आणि आपल्या बायकोमुळे आपल्याला मान खाली घालवी लागत आहे याचा तो विचार करीत होता. यासीनने आता शरीफचा कायमचा काटा काढण्याचा विचार केला. त्याने ही गोष्ट आपले मित्र रफीक महंमदापुर, मोसीन बल्लारी, अल्लाुद्दीन बावची यांना सांगितली. त्यांना ही शरीफचे यासीनच्या बायकोबरोबर असलेले विवाहबाहय संबंध माहित होते. त्यांनी यासीनला शरीफला संपविण्यासाठी मदत करतो असे सांगितले. इकडे शरीफ हा दि.शुक्रवारी ९ फेब्रूवारी रोजी संध्याकाळी महंमदापुरे याचे वडिल अजारी असल्याने त्यांना पाहण्यासाठी म्हणून विजयापूर येथील सरकारी रुग्णालयात गेला. तेथे त्यावेळी यासीन, महंमदापुरे, बल्लारी अल्लाउद्दीन बावची हे होते. शरीफ हा महंमदापुरे याच्या वडिलांना पाहून घरी परत जात असताना यासीन याने त्याला चल चहा पिऊया असे म्हणाला, तेथीलच एका गाडयावर त्यांनी चहा घेतला. त्यानंतर त्यांनी शरीफला सोलापूर रस्त्यावर थोडे काम आहे असे सांगून आपल्या कारमध्ये बसविले. कारमध्येच त्याच्याशी गोड बोलत त्याला थोडी खीर ही प्यायला दिली. त्यानंतर काही वेळाने त्यांनी दारू ही प्यायली त्यावेळी मुद्दामच त्यांनी शरीफला जास्तच दारू पाजली. विजयापूरहून सोलापूरला रात्रीच्या सुमारास ते आले. सोलापूरच्या अलिकडे एका निर्जन स्थळी कार थांबवून शरीफबरोबर मुद्दामच भांडण उकरून काढले. यासीनने त्याला तुला माझ्या बायकोबरोबर संबंध ठेवू नकोस असे म्हणत असताना तु संबंध ठेवतोस काय म्हणत हाणामारीला सुरूवात केली. त्या चौघांनी ही त्याला जबर मारहाण करीत त्याचा दोरीने गळा आवळला.तो त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत असताना यासीन याने शरीफच्या छातीत आणि अंगावर चाकूने सपासप वार केले. शरीफ याच्या अंगातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. आता त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावायची कशी याचा ते विचार करीत असताना त्यांनी त्याचा मृतदेह महाराष्ट्र हद्दीत नेऊन टाकण्याचा विचार केला. त्यांनी तशीच कार त्याच्या मृतदेहासह विजयपूर गुहागर हायवेने विजयपुर, सोलापुर, जत अशा मार्गे घातली. जतहून पुढे आल्यानंतर कवठेमहंकाळ पासून नागज मार्ग भीवा घाटात आले. रात्रीच्या अंधारात त्या हायवेवर फारसे कुणी नव्हते. त्यावेळी रात्रीचे २.३० वाजले असतील, नागज पासून सुमारे ३ ते ४ कि.मी अंतरावर एका निर्जन स्थळी त्यांनी कार थांबवली. त्या कारमधून शरीफ याचा मृतदेह बाहेर काढला. रस्त्याच्या आता थोडे बाजुला जात एका रस्त्यालगत असणाऱ्या पुलाखाली त्याचा मृतदेह नेला. बरोबर येताना त्यांनी तेलाचा कॅन घेतलेला असल्याने त्यांनी तेल मयत शरीफच्या अंगावर ओतले. त्यांनी त्याचा मृतदेह जाळून टाकला. तो मृतदेह पुर्णपणे जळाला आहे किंवा नाही हे त्यांनी पाहिले नाही. लागलीच त्याचा मृतदेह जाळल्यानंतर त्यांनी तेथून कारने परत रातोरात विजयपुर गाठले. दुसऱ्या दिवशी शनिवार दि १० फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजणेच्या सुमारास तेथे लघुशंकेला जाणाऱ्या एका व्यक्तीस रस्त्याच्या पुलाखाली कोणाचा तरी अर्धवट जळालेला मृतदेह दिसून आला. त्यांने या घटनेची माहिती लागलीच कवठेमहंकाळ पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच कवठेमहंकाळ पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत घटनेची पाहणी करून पंचनामा करायला सुरूवात केली. घटनास्थळी जिल्हा पोलीस प्रमुखसंदीप घुगे, मिरज उपविभागीय पोलीस अधिकारी, जतचे वरिष्ट पोलीस अधिकारी यांनी भेट देत घटनेची माहिती घेतली मयत व्यक्तीच्या जळालेल्या अर्धवट मतदेहाचे फोटो पोलिसांनी सोशल मिडियावर टाकला. जेणे करून मयत व्यक्तची ओळख पटविण्यास मदत होईल. हा मृतदेह अर्धवट जाळून टाकला असल्याने संबंधीत व्यक्तीचा खून दुसरीकडे करून पुरावा नष्ट करणेसाठी या परिसरात आणून टाकला असावा अशी शंका पोलीसांनी व्यक्त करून कवठेमहंकाळ तसेच आजुबाजुच्या व शेजारच्या कर्नाटक राज्यातील पोलीसांशी संपर्क करून या वर्णनाची कुणी व्यक्ती बेपत्ता आहे का? याची माहिती घेतली हि महिती घेत असताना त्यांना कर्नाटकातील विजयपुर येथील गोलघुमट पोलीस ठाण्यात दि.९ फेब्रुवारी २०२४ पासून शरीफ हसनसाब गनवार (वय ३४) हा बेपत्ता असल्याची फिर्याद त्याच्या पत्नीने दिली होती. कवठेमहंकाळ पोलीसांनी शरीफ याच्या पत्नीला गोलगुमट पोलीस स्टेशनला बोलावून घेऊन मयत शरीफ याचा अर्धवट जळालेले फोटो दाखविले असता तिने ते फोटो ओळखून मयत व्यक्ती ही तिचा पती शरीफ हसनसाब गनवार असल्याचे पोलीसांनां सांगितले. मयताची ओळख पटल्यानंतर पोलीसांनी तिच्याकडून या घटनेची फिर्याद घेऊन शरीफ याच्या विषयी माहिती घेतली. मयत शरीफ याचे यासीन याच्या पत्नीबरोबर अनैतिक सबंध होते. त्यातून यासीन याने शरीफ याला धमकी दिल्याचे तिने पोलीसांना सांगितले. या हिंटवरून पोलीसांनी गोलगुमट पोलीसांच्या मदतीने यासीन अन्वर बल्लारी (वय ३०) याला विजयपूर येथील जेल दर्गा परिसरातून ताब्यात घेतले. त्याच्याकडे शरीफ याच्या खूनाविषयी चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना देवून या घटनेतील आपल्या सहकारी मित्रांची नावे ही पोलीसांना सांगितली. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी मोसीन अन्वर बल्लारी (वय ३२) अल्लाउद्दीन महेबुबसाब बावची (वय २८) आणि रफीक शब्बीर महंमदापुरे (वय ३०) यांना ख्वॉज मस्जिद जेल दर्गा परिसर येथून ताब्यात घेतले. त्यांनी ही पोलीसासमोर आपल्या गुन्हयाची कबुली दिली. मयत शरीफ याच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी शरीफ हसनसाब गनवार (३५) याचा खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गोलगुमट पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर हा गुन्हा कवठेमहंकाळ पोलीसात वगे करून त्याचे विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना मा.कोर्टासमोर पोलीसांनी उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली कार आणि चाकू व तेलाचा कॅन जप्त केला. या घटनेचा तपास वरिष्ट पोलीस अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली पो.निरी.सतीश शिंदे, हवा. संदीप नलावडे, बिरोब नाळे, संदीप गुरव, विक्रम खोत, सागर लवटे, अमर नरळे याच्या पथकाने केला. नाजुक संबंध एकदा का उघडकीस आले की त्यातून खूनासारखी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## स्वार्थी मुलाला होती जमिनीची ...

कसाबसा आपला जीव वाचवला. घटनेनंतर आरोपीने तेथून पळ काढला. याप्रकरणी पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत मनोजला अटक केली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## येडशीमध्ये डीजे बंद करायला...

ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक कासुळे, पीएसआय बनसोडे, पोलीस हेड कॉन्स्टेबल पठाण कर्तव्यावर तैनात होते. दरम्यान शिवजयंती मिरवणुकीसाठी लावलेल्या डीजे परवाण्याबाबत पोलिसांनी विचारपूस केली असता शिव जयंती उत्सव समितीने ते सर्व परवाने अध्यक्षाकडे असल्याचे तोंडी सांगितले. वास्तविक मिरवणुकीसाठी कुठलेही डीजे परवाना नसल्याची प्राथमिक माहिती मिळाली असली तरी पोलिसांनी त्याकडे दुर्लक्ष केले. शिवजयंती मिरवणुकीमध्ये असंख्य तरुण मद्यधुंद अवस्थेत नाचत होते. दरम्यान १० ते १०.३० दरम्यान वेळेचे बंधन पाळून पोलिसांनी जयंती मिरवणुकीतील डीजे बंद करण्याच्या सूचना दिल्या. त्यावेळेस मात्र शिवजयंती मिरवणुकी मधील एक टोक्याने पोलिसांशी हसत घालत पोलिसास मारहाण करण्यास सुरुवात केली. दरम्यान शिवजयंती बंदोबस्तासाठी तैनात असलेले सहायक पोलीस निरीक्षक कासोळी यांनी सदरील माहिती त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री गणेश कानगुडे यांना माहिती दिली. दरम्यान धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कानगुडे हे सकाळीच न्यायालयीन कामकाजासाठी औरंगाबाद येथे गेले होते. दिवसभरातील काम आटोपून ते धाराशिव कडे परत येत होते. ते येडशीपासूनच जवळच अंतरावर आले असता त्यांना सदरील माहिती मिळाली. घटनेचे गांभीर्य ओळखून असे काही मिनिटातच येडशी येथे दाखल झाले. तोपर्यंत शिवजयंती मिरवणूक शहाजी चौकात आली होती. शिवजयंती मिरवणगिरी जवळ जात त्यांनी डीजे बंद करण्याच्या सूचना दिल्या. तेव्हा जयंती मिरवणुकीमध्ये असलेले संजय लोखंडे तुषार शिंदे शिवा नलवडे, बंडू देशमुख, गणेश वीर, नितीन शिंदे यांनी गैर कायद्याची मंडळी जमवून पोलिसांची पूजत घालत दादागिरी ची भाषा चालवली. तर काही जणांनी पोनि गणेश कानगुडे यांच्या पाठीमागे जाऊन त्यांचा गळा आवळण्याचा प्रयत्न केला.धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुरण ६२/२०२४ कलम ११७, ५०४, १४१, १४३, १४७, १४९, ३०८, २९४, ३५३, ३३२, १५२, १८९, ३४१ भादवि सह कलम ३७ (१) (३)/१३५ मपो कायदा सह कलम ७ कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाच्या पुढील तपास धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कानगुडे हे करीत आहेत.

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ अंक : १० रविवार दि. २५ फेब्रुवारी २०२४ ते रविवार दि. ०३ मार्च २०२४ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड



सत्तेचा माज चढताच कार्यकर्ते उन्मत्त झाले शिंदे गटाच्या गुडांनी विद्यार्थ्याला ठार केले ३

ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान ४

संतप्त महिलांचा गटविकास अधिकारी कार्यालयात हंडा कळशीसह ठिय्या आंदोलन ५

देवणी तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते शरदचंद्र पवार साहेबांच्या विचारांचे! ७

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात ९४५ नवीन पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती! ८




अजिंठ्याच्या कुशीतून उगम पावणारी ही वाघूर नदी. वाकोद या भाऊंच्या जन्मगावी प्रवाहित झालेली. श्रद्धेय मोठ्याभाऊंप्रती नितांत आदर भावना व्यक्त करणारी ही आशयसंपन्न रचना साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त श्रीकांत देशमुख यांची. *(रचना : २००६, जळगाव)*

## भाऊ

'वाघुर'च्या खोऱ्यामधी,
तुवा टेकविला माथा ।
हातापायाच्या रेघात,
घोळविली गावगाथा ।।

तुझ्या मनातली नाती,
तुझ्या पायतळी माती।
दऱ्याखोऱ्यात हासली,
गर्द गवताची पाती ।।

भंडाऱ्याच्या डोंगरात,
तुकोबाही अभंगला ।
तुझ्या हाकेच्या पोटात
तुकाराम प्रसवला ।।

स्वता होऊनि जाणता,
नेणत्याला दिले बळ ।
काबाडल्या देहावरी,
पाठीलागी आले वळ ।।

माती रडे ढेकळात,
गाव कापे काळजात ।
जन्म जगता मरता,
हरवली देहकात ।।

उन्हे झेलता पेलता,
कातळला देहमाथा ।
शेतकीला दिले बळ,
असा माणूस जाणता ।।

तुझ्या नसानसातून वाहे,
वाघुरचे निळे पाणी ।
भावभोळ्या माणसांची,
तुझ्या ओठी देवगाणी ।।

नदीकाठ रुंदावला,
जरीकाठाचा पदर ।
जशी नाथाच्या हातची,
तुवा घेतली कावड ।।

कावडीत भरलेले,
अजिंठ्याचे निळे पाणी ।
घेते झेलून आभाळ
काळ्या मातीची कहाणी ।।

*— श्रीकांत देशमुख*

**श्रद्धेय भवरलालजी जैन यांना श्रद्धावंदनदिनी कृतज्ञतापूर्वक प्रणाम...**

*जन्म : १२ डिसेंबर १९३७ निर्वाण : २५ फेब्रुवारी २०१६*


भवरलाल अँण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन www.bkjfoundation.org
कांताई नेत्रालय ॲडव्हान्स्ड आय केअर
जैन स्पोर्टस् अकॅडमी आरोग्य. आत्मनिर्भर. अमेयता.
भाईसाहेब सुंदरलाल मल्हारा पोटेन्शियल डेव्हलपमेन्ट अकॅडमी
जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी. www.jains.com
भवरलालजी आणि कांताई जैन परिवार www.bhavarlaljain.in
जैन फार्म फ्रेश फुड्स् लि. मस्त चवीमागचं तुमचं पाककौशल्य. www.jainfarmfresh.com
अनुभूति स्कूल www.anubhutischool.in
गौराई कृषी-तंत्र निकेतन
बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्ट
गांधी रिसर्च फाऊंडेशन • सत्य • अहिंसा • शांती www.gandhifoundation.net

25 FEBRUARY TO 03 MARCH 2024 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 2/24/2024 8:35 PM Page 1



**कसली जात आणि कुठला धर्म**
**सामान्य माणसाला फक्त भाकरीची आस आहे!**
**स्वातंत्र्य व संविधानाच्या गळ्या भोवती**
**पुढाऱ्यांच्या अंधभक्तांचा फास आहे...!**


# सावधान! देश आणखी एका फाळणीच्या उंबरठ्यावर!!

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या लाखो हुतात्म्यानी आपलं रक्त सांडलं, आपल्या घरादारावर पाणी सोडलं, त्यांना जर त्या वेळेला समजलं असतं, की आपण ज्यांच्यासाठी आपलं बलिदान देणार आहोत, ते भविष्यात नालायक निघणार आहेत आणि देशाला पुन्हा पारतंत्र्यात लोटणार आहेत. हे जर त्यांना त्या वेळेला कळालं असतं, तर त्यांनी स्वातंत्र्यसंग्रमाचे हवन कुंड पेटवलेच नसते. आणि त्यात आपलं बलिदान दिलेच नसते. देशावर इंग्रजांचं राज्य असताना जी परिस्थिती होती, त्याहीपेक्षा वाईट स्थिती आज लोकशाहीमध्ये आहे. गोऱ्या इंग्रजांपेक्षा काळे इंग्रज भयंकर निघाले. त्यामुळे या काळया इंग्रजांच्या हातून देशाला सोडवण्यासाठी, आज दुसऱ्या स्वातंत्र्य युद्धाची आवश्यकता आहे. कोणत्याही देशाचा विकास हा परिवर्तनातून होत असतो. जर आर्थिक, सामाजिक, आणि वैचारिक परिवर्तन झाले, तर देश दोन पावले पुढे जाऊ शकतो. पण दुर्दैवाने या देशात जे कोणी सत्तेवर आहेत, ते देशाला पुन्हा मागे नेत आहेत. कारण धर्म, देव, आस्था, परंपरा या सगळ्या गोष्टींचा लोकशाही किंवा संविधानाशी काडीचाही संबंध नाही. तरीसुद्धा राज्यकर्ते हेतू पुरस्कार या सगळ्या गोष्टींमध्ये लोकांना अडकवून, देशातील जे मूळ प्रश्न आहेत, त्या प्रश्नांपासून लोकांचं लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे या देशात पुन्हा एकदा पाचशे वर्षांपूर्वीची परिस्थिती निर्माण होण्याचा धोका निर्माण झाला आहे. पण याला कारणीभूत दुसरे तिसरे कोणी नसून, इथले बिनडोक लोकच आहेत. कारण त्यांनीच भ्रष्टाचारी, बलात्कारी, व गुन्हेगारी प्रवृत्तीचे पुढारी तयार केले. आणि त्यांच्या हाती या देशाची कमान सोपवली आहे.त्यामुळे या देशाचे काय होणार हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. मुळात धर्म आणि आस्था या दोन गोष्टी अफूच्या गोळी सारखे असतात. त्यामुळे धर्म आणि आस्था यांच्या आहारी गेलेल्या लोकांना, धर्म आणि आस्थेतून निर्माण होणाऱ्या जातीय विद्वेषाचे दुष्परिणाम दिसत नाहीत. कारण लोक कुणाच्यातरी चिथावणीवरून आपले मत बनवतात. आणि त्यानुसार रस्त्यावर उतरून हैदोस घालतात .पूर्वी इस्लाम खत्रे मे है! अशा आरोळ्या ठोकून मुस्लिम मुल्ला मौलवी ज्याप्रमाणे मुसलमान धर्मातील तरुणांना भडकावून जेहाद साठी तयार करायचे. त्याच पद्धतीने काही हिंदुत्ववादी नेते आज हिंदूंना धर्म संकटात आहे अशी खोटी बतावणी करून तरुणांना भडकावत आहेत. त्यामुळे हिंदू आणि मुसलमान या दोन धर्मातील लोकांमधील दरी वाढत चाललेली आहे. मुस्लिम द्वेशावर हिंदुत्वाचे सुरू असलेले राजकारनाने देशाला आणखी एका फाळणीच्या उंबरठ्यावर उभे केलेले आहे. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर मोहम्मद अली जिनाने, मुसलमानांना भडकावून देशात जातीय दंगली घडवून आणल्या. आणि मुस्लिमांसाठी स्वतंत्र देशाची मागणी केली. त्यानुसार पाकिस्तान नावाचे इस्लामी राष्ट्र तयार झाले. पण धर्माच्या आधारावर तयार झालेल्या, पाकिस्तानमध्ये गेल्या ७५ वर्षात जी परिस्थिती निर्माण झालेली आहे, तशीच परिस्थिती हिंदुत्ववाद्यांमुळे भारतात निर्माण होण्याचा धोका आहे. त्यामुळे जाती धर्माच्या नावाने सुरू असलेला हा नंगानाच थांबवण्यासाठी, सर्व धर्माच्या लोकांनी हिंदू आणि मुस्लिम धर्मातील जातीयवादाना रोखणे गरजेचे आहे. पृथ्वीवरील सर्व प्राणीमात्रात परमेश्वराने माणसालाच तल्लख बुद्धी दिलेली आहे. आणि याच बुद्धीच्या जोरावर माणसाने आपला विकास केला. नवेनवे शोध लावले. अगदी परग्रहावर पाऊल ठेवण्यापर्यंत माणसाने विज्ञानाच्या जोरावर प्रगती केली. माणसाला बऱ्या वाईट गोष्टी समजतात. त्याबाबतचे त्याला ज्ञान असते. असे असताना आज काही लोक आपली बुद्धी गहाण ठेवून, एखाद्याच्या मागे फरफटत जात आहेत. खास करून राजकारणात स्वतःला कार्यकर्ते म्हणून घेणारे काही लोक, अक्षरशः अंध फक्त बनले आहेत. भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली तुरुंगात गेलेला नेता जेव्हा जामिनावर सुटून येतो, तेव्हा त्याच्या मिरवणूका काढल्या जातात. त्याला हार तुरे घातले जातात आणि हे सर्व अंधभक्त असलेला कार्यकर्ता करीत असतो. यावेळी त्याने आपली सद्विवेक बुद्धी अक्षरशः गहाण ठेवलेले असते. आपण ज्याचा सत्कार करतोय, आपण ज्याला हार तुरे घालतोय, तो नेता भ्रष्ट आहे, समाजासाठी घातक आहे याची त्याला जाणीव असून सुद्धा, तो त्या नेत्याच्या मागे फरफटत जात असतो. त्यामुळे अशा फरपटत जाणाऱ्या बिनडोक कार्यकर्त्यांच्या जीवावर भ्रष्टाचारी नेते मोठे होतात. त्यामुळे नेत्यांना दोष देऊन फायदा नाही. नेत्यांना मोठे करणारे जे अंधभक्त आहेत, ते खरे दोषी आहेत. त्यामुळे या अंध भक्तांचे काय करायचं हाच समाजासमोर खरा प्रश्न आहे. कोणत्याही राज्यकीय पक्षाची ताकत त्याच्या कार्यकर्त्यांमध्ये असते. त्यामुळे कार्यकर्ता प्रामाणिक आणि निस्वार्थी असायला हवा. त्याची बांधिलकी केवळ त्याच्या नेत्याशीच असता नये, तर समाजाशी सुद्धा त्याची बांधिलकी असायला हवी. अशावेळी त्याचा नेता जर चुकीचे वागत असेल, आणी त्याचा समाजावर वाईट परिणाम होणार असेल, तर कार्यकर्त्यांमधे आपल्या नेत्यालांही जाब विचारण्याची धमक असायला हवी. पण आजचा कार्यकर्ता हा विकला गेलेला आहे. नेत्यांनी फेकलेल्या तुकड्यावर जगणारा एक गुलाम अशी आजच्या कार्यकर्त्याची प्रतिमा निर्माण झालेली आहे. त्यामुळे त्याला सामाजिक बांधिलकीचा विसर पडलेला आहे. अशावेळी त्याच्या नेत्याने त्याला जे काही सांगितलेले आहे, जे काही त्याच्यावर काम सोपवलेले आहे, ते चांगले आहे किंवा वाईट आहे याचा जराही तो विचार करीत नाही. आणि आपल्या नेत्याच्या मागे फरपटत जातो. यामुळेच या देशात वाईट प्रवृत्तीचे नेतृत्व निर्माण व्हायला सुरुवात झाली आहे. अशा नेतृत्वाला अंधभक्त कार्यकर्त्यांचं पाठबळ मिळत असल्याने, गुंड माफिया नेते मोठे होतात आणि समाजाची हवी तशी पिळवणूक करतात. याला तो नेता जितका जबाबदार असतो. तितकाच त्याच्या पापात सहभागी असलेल्या कार्यकर्ता ही जबाबदार असतो. म्हणूनच कार्यकर्त्याने आपल्या नेत्याच्या मागे फरकटत जाताना, समाजात आपली प्रतिमा खराब होणार नाही याचेही भान राखणे आवश्यक आहे.

# दगडात नव्हे तर माणसात देव शोधणारे संत गाडगेबाबा!

**आधुनिक महाराष्ट्रात संत, महंत, बाबा, बापू, माता यांचा सुळसुळाट झाला असून त्यांचा भक्त परिवार देखील लक्षणीय असल्याचे दिसते ते खरे संत महंत आहेत की खोटे भोंदू आहेत याचा निर्णय त्यांच्या भक्तांनी घ्यायचा असून प्राप्त परिस्थितीत असे दिसते की ते काहीही उद्योग धंदा करीत नसले तरी त्यांचा एकूणच श्रीमंती थाट त्यांचे राहणीमान त्यांचे आश्रम, स्थावर मालमत्ता चकित करणारे आहेत. हे सर्व वैभव आले कुठून असा प्रश्न पडणे साहजिकच आहे, परंतु गेल्या काही काळात त्यांच्याबद्दल उजेडात आलेले प्रकरणं आणि त्यामुळे त्यातील काहींना तुरुंगवासाची करावी लागलेली वारी, न्यायालयाने ठोठावलेल्या शिक्षा यांचा विचार केल्यास त्यांच्यात बहुसंख्य बाबा हे भोंदू, स्त्री लंपट, अत्याचारी, व्याभिचार्य असल्याचे सिद्ध झाले आहे. आसो...**

सध्याचे बिघडलेले समाज व समाज स्वास्थ्य, स्वार्थी मानसिकता, समाजसेवेच्या नावाखाली पोसलेली खिसाभरूवृत्ती ह्या पाश्वभूमीवर गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला असे म्हणत तत्कालीन काळात कीर्तन करणारे केसांच्या झिंज्या, खापराच्या तुकड्याची टोपी, ठिगळजोडलेले कपडे, दाढीचे खुंट वाढलेले एका कानात कवडी तर दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच हातात खराटा अशा अवतारातील गाडगेबाबा नजरेसमोर उभे राहतात. ज्यांनी समाज प्रबोधनाची कास धरून निस्वार्थीपणे सामाजिक सुधारणा, अंधश्रद्धा निर्मूलन, जातीभेद, दिन दुबळ्या गरीब अनाथ आबला लोकांच्या उत्थानासाठी घरादारावर नांगर फिरवून गावोगावी भटकंती करीत, कधी अर्धपोटी तर कधी उपाशी राहून आपल्या कार्याचा अविट ठसा उमटविला त्या गाडगेबाबांची प्रकर्षाने आठवण आल्याशिवाय राहत नाही. त्यांचे मूळ नाव डेबुजी झिंगराजी जानोरकर असून जन्म २३/२/१८७६ रोजी शेंडगाव तालुका दर्यापूर जिल्हा अमरावती येथे गरीब शेतकरी कुटुंबात झाला. वयाच्या २९ व्या वर्षी त्यांनी नेसत्या वस्त्रानिशी समाज सुधारण्यासाठी गृहत्याग केला त्यावेळी त्यांची पत्नी तीन महिन्याची गरोदर होती. ते गावोगावी भटकून समाज प्रबोधन करीत ते ज्या गावी जात प्रथम तो परिसर खराट्याने स्वच्छ करीत ते पाहून कुतूहलाने लोक जमा होत तेव्हा त्यांना समजेल अशा सोप्या वराडी भाषेत बोली भाषेत समाजातील दांभिक रुडी परंपरा अंधश्रद्धा यावर हल्ला करून शिक्षण स्वच्छता चारिञ्य यांची शिकवण देत. बाबा आषाढी आणि कार्तिकी वारी निमित्त पंढरपूरला जायचे पण ते कधीच मंदिरात गेले नाहीत तेथे ते कीर्तनात रंगून जायचे लोक हो बाप्पा देव देवळात नसून माणसात बघा दिनदलित गरीब अनाथ अपंग यांची सेवा करा सर्व माणसं सारखी असून भेद भाव अस्पृश्यता पाळू नका व्यसनाच्या आहारी जाऊ नका चोरी करू नका सावकाराकडून कर्ज काढू नका कितीही गरीबी असली तरी लेकरा बाळांना शिक्षण द्या असे त्यांचे प्रबोधनात्मक किर्तन उत्तरोत्तर रंगतदार होत जाऊन स्रो त्यांना अंतर्मुख करी त्या काळातील कमाल जातियतेमुळे अस्पृश्यांना देवदर्शन दुरूनच होत होते तसेच त्यांना जवळ देखील कोणी येऊ देत नव्हते त्यामुळे बाबांनी पंढरपुरात अस्पृश्यासाठी वेगळी धर्मशाळा बांधली. एखाद्या गावात सार्वजनिक विहिरीच्या परिसरात पालापाचोळा घाण दिसली की खराट्याने घाण स्वच्छ करीत गावकऱ्यांना सांगत बाबांनो ह्या घाणीमुळे रोगराई येते ती आली की लोक देवाला नारळ फोडतात त्यामुळे रोगराई जाते ही अंधश्रद्धा आहे घाणीचे पाणी दूषित होते ते पाणी पिण्याने रोगराई पसरते असे सांगत असताना स्वच्छ करा स्वच्छ करा गाव आपला स्वच्छ करा जिकडे तिकडे घाण तुम्हाला अन्न तरी कसे गोड लागते अशा पद्धतीने स्वच्छतेचे महत्व पटवून देत. त्यांची गावोगाव भटकंती सुरू असताना ऋणमोचनच्या यात्रेच्या वेळी नदीपात्रात यात्रेकरूंच्या आंघोळी आणि अन्य कारणाने जमीन निसरडी झाल्यामुळे अनेक यात्रे करू घसरून पडले तर काही जखमी झाले ते पाहून बाबांनी टिकाव फावड्याने ती जमीन खणून त्यावर सुखी माती टाकल्यामुळे ती वापरण्यायोग्य झाली. हे करताना मामेभाऊ बळीराम ने त्यांना पाहिले त्यांनी बाबाची आई बायको आणि मुलगा गोविंद यांची भेट घालून दिली तेव्हा आई बायकोने घरी येण्याचा आग्रह केला तेव्हा बाबा म्हणाले की आई मी आता तुझ्याबरोबर येतो पण जर मला उद्या मरण आले तर काय करशील त्यापेक्षा मला समाजाचे कार्य करू दे असे सांगून गुंगारा देत पसार झाले. देवाचे भजन करा पण देवाला कोंबड बकरे कापू नका मुक्या जीवाचा बळी देऊ नका. बळी दिलेला जीव देव खात नाही माणसंच खातात असे स्पष्ट करीत येड लागले जगाला देव म्हणती.... दगडाला तुम्हाला कुणी तयार केले ... देवाने देव कशातून तयार झाला दगडातून दगड कोणी फोडला... वडाराने त्यांची मूर्ती कोणी बनवली शिल्पकाराने मग देवाचा बाप कोण येड लागलं जगाला देव म्हणती दगडाला अशाप्रकारे प्रश्नोउत्तराच्या खुमासदार शैलीतून प्रबोधन करीत. लोकांचे बाबावर नेतांत श्रद्धा होती त्या श्रद्धेपोटी मिळालेल्या देणग्या तुनठिकठिकाणी अनाथालय शाळा महाविद्यालय धर्मशाळा उभारल्या मी पामर परीट समाजात जन्माला आलो परटाचा धंदा कपडे धुवून घाण स्वच्छ काढण्याचा मला देवाने कपडे धुण्यासाठी पाठविले नसून समाजात ज्या वाईट रुढी परंपरा अंधश्रद्धा अज्ञान जातीतील मळमळ साचलेली आहे ती धुवून काढण्यासाठी पाठविले आहे असे ते लोकांना सांगत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि गाडगेबाबा समकालीन होते गाडगेबाबा जरी डॉक्टर आंबेडकरा पेक्षा पंधरा वर्षांनी मोठे असले तरी अन्यराजकीय व समाजसुधारका पेक्षा डॉक्टर आंबेडकरांच्या कार्याने ते अत्यंत प्रभावीत होते दोघांमध्ये दाट ऋणानुबंध होता तो ऋणानुबंध दोन व्यक्ती मधील नसून आचार विचार तत्त्वनिष्ठता आणि परस्परांच्या कार्याचा आदर ह्यातून निर्माण झाला होता त्याला तत्त्वनिष्ठ बैठक असल्यामुळे तो शेवटपर्यंत अतूट राहिला त्यांच्यातकधीच मतभेदांची दरी निर्माण झाली नाही ह्या ऋणानुबंधनातूनच गाडगेबाबा किर्तन प्रसंगी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्य कर्तुत्व आणि दिनदुबळ्या समाजाच्या नेतृत्वाचा आवर्जून उल्लेख करीत. दोघांचे कार्य समान असून किर्तन हे गाडगेबाबांच्या लोकप्रबोधन जागृतीचे माध्यम होते तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी ते कार्य सामाजिक चळवळ आणि राजकीय माध्यमातून केल्याचे दिसते ह्या दोन्ही महापुरुषांना एकमेकाबद्दल अतिव आदर प्रेम जिव्हाळा समन्वय आणि प्रचंड आत्मीयता होती त्यामुळे बऱ्याचदा ते एकमेकाशी सल्ला मसलत करीत. १४ जून १९५१ ला गाडगेबाबा आजारी असल्यामुळे दादर येथील दवाखान्यात ॲडमिट झाले त्यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर केंद्रीय कायदेमंत्री होते हे दिल्लीला जाण्यासाठी मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशनला पोहोचले असताना तिथे त्यांनाही बातमी समजली तेव्हा त्यांनी पुढील सर्व कार्यक्रम रद्द करून गाडगेबाबांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी दवाखाना गाठला इतके त्यांचे परस्पर प्रेम होते बाबांचे मुंबईत कीर्तन असताना डॉक्टर आंबेडकर संधी मिळेल तेव्हा कीर्तन ऐकायला जात असेल कीर्तनात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जमिनीवर बसून कीर्तन ऐकत ते म्हणायचे जिथे गाडगेबाबा तिचे घाण असू शकत नाही आज त्यांच्या जयंती दिनानिमित्त क्राईम संध्याच्या वतीने कोटी कोटी अभिवादन!



**– प्राचार्य शंकर सोनवणे, लातूर**

## ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान

# ‘अष्टपैलू’ अशोक सराफ हे मराठी मातीतील अस्सल हिरा - मुख्यमंत्री



**मुंबई/प्रतिनिधी**

आपल्या अविस्मरणीय भूमिकांनी अष्टपैलू अभिनेते अशोक सराफ यांनी प्रेक्षकांची अभिरुची संपन्न केली. अवघ्या महाराष्ट्राला त्यांनी पोट धरुन हसवले. प्रसिद्धीचे इतके वलय मिळूनही त्यांनी कधीही जमीनीशी नातं तोडलं नाही. खऱ्या अर्थाने ते मराठी मातीतील अस्सल हिरा आहेत, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्या कार्याचा गौरव केला. मराठी चित्रपटसृष्टीसाठी जे जे आवश्यक आहे, त्या सर्व सुविधा राज्यात उपलब्ध करून देण्याचा आणि जगाला हेवा वाटेल अशी फिल्मसिटी आपण तयार करू, असे प्रतिपादन त्यांनी केले. महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान असणारा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना तर मानाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ पार्श्वगायक सुरेश वाडकर यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्री श्री शिंदे बोलत होते. याशिवाय, मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीसाठी आपल्या कलेच्या माध्यमातून अनेक वर्ष योगदान देत रसिकांची व कलासृष्टीची सेवा करणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना दिला जाणारा राजकपूर जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कार, चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कारही यावेळी प्रदान करण्यात आले. या समारंभास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार मनीषा कायंदे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, महाराष्ट्र राज्य चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.अविनाश ढाकणे आणि सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे आदींची उपस्थिती होती. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, अष्टपैलू, हा शब्द खऱ्या अर्थाने ज्यांना लागू होतो ते नाव म्हणजे अशोक सराफ आहे. सलग ५० वर्षे असंख्य भूमिका करुनही ज्यांच्यात अभिनयाची आणि नवं काही तरी करून दाखविण्याची भूक अजूनही कायम आहे. अशोक सराफ हे वयाचा अमृत महोत्सव साजरा करत असताना राज्य सरकारचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार त्यांना देण्यात येत आहे, हा अवघ्या महाराष्ट्रासाठी अभिमानाचा आणि अमृताहूनही गोड क्षण असल्याचे त्यांनी सांगितले. मागील वर्षी ज्येष्ठ गायिका आशाताई भोसले आणि ज्येष्ठ निरुपणकार तिर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरवण्याची संधी मला मिळाली. यावर्षी अशोक सराफ यांचा आपण गौरव करत आहोत. त्यांनी त्यांच्या अभिनयाने मराठी रसिकांवर राज्य केले. प्रसिद्धीचे इतके वलय मिळूनही सराफ यांनी कधीही जमीनीशी नातं तोडलं नाही. मराठी रसिकांनीही त्यांच्या अभिनयावर भरभरुन प्रेम केले. त्यांच्याप्रमाणेच सुरेश वाडकर यांनी अत्यंत कष्टपूर्वक आपली सांगितीक कारकीर्द उभी केली. मराठी आणि हिंदीच नव्हे तर विविध भाषांतील त्यांची गाणी विशेष गाजली. सुरेशजींचा सुरेल आवाज आजही आपल्याला मंत्रमुग्ध करतो, अशा शब्दात त्यांनी ज्येष्ठ गायक सुरेश वाडकर यांचा गौरव केला. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, मुंबईतल्या फिल्मसिटीत शुटींगसाठी लागणाऱ्या सर्व अत्याधुनिक व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच, मुंबई फिल्मसिटीबाहेर इतर जिल्ह्यात चित्रपटाचे शुटींग करायचे असेल तर ‘वन विंडो सिस्टीम’चा निर्णय सांस्कृतिक विभागाने घेतला आहे. या शुटींगसाठी कोणतेही शुल्क घेतले जाणार नाही. राज्यात ७५ नवे चित्र नाट्यगृह उभारण्यासाठी ९ कोटी ३३ लाखाचा निधी मंजूर केला असल्याचे त्यांनी सांगितले.

**अशोक सराफ हे मराठी चित्रपटाचा चेहरा : उपमुख्यमंत्री फडणवीस**

आजचा दिवस सगळ्यांसाठी आनंदाचा दिवस आहे. चित्रपट पुरस्कारांचा बॅकलॉग भरून आपले कलाविश्व समृध्द करणारे अनेक मोठे कलावंत येथे आहेत. चित्रपट सृष्टीला आणि आपल्या जीवनाला समृध्द करणारी ही मंडळी आहेत. अशोक सराफ यांच्या अमृत महोत्सवात आपण त्यांना महाराष्ट्र भूषण देत आहोत. मराठी चित्रपटाचा चेहरा हे अशोक सराफ आहेत, अशी भावना उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी मनोगतात व्यक्त केली. ते म्हणाले की, मराठी, हिंदी चित्रपटसृष्टी, नाटक यामध्ये सर्व पद्धतीच्या भूमिका अशोक सराफ यांनी साकारल्या. त्यांनी साकारलेला नायक हा स्वप्नातील नव्हे तर खऱ्याखुऱ्या जीवनातील नायक आहे. त्यांचे चित्रपट पाहून आम्ही मोठे झालो. सुरेश वाडकर यांनी मागील कित्येक वर्षे त्यांच्या सुरेल आवाजाने रसिकांचे मनोरंजन केले. ज्या लोकांनी आपले जीवन आनंदमय केले, त्यांना पुरस्कार देण्याची संधी आपल्याला मिळाली, अशी भावनाही यांनी यावेळी व्यक्त केली.

**महाराष्ट्राची भूमी ही कलाकारांची खाण : सुधीर मुनगंटीवार**

सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, महाराष्ट्र हे जसे आर्थिक शक्तिकेंद्र आहे तसे ते सांस्कृतिक शक्तिकेंद्र आहे. महाराष्ट्राची भूमी ही कलाकारांची खाण आहे. या कलावंतांचा सन्मान करताना सांस्कृतिक कार्य विभाग सोनेरी झाला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. फिल्मसिटीच्या बाहेर जिथे चित्रीकरण असेल तिथे शुल्क आकारले जाणार नाही. मनोरंजन करातून सूट या अगोदरच दिली असल्याचे सांगून जगातील सर्वात उत्तम फिल्मसिटी करू शकतो, असा विश्वास मंत्री मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

**रसिक प्रेक्षकांचे प्रेम कायम हृदयात राहील : अशोक सराफ**

महाराष्ट्रातील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार तुम्ही मला दिला, याचा खरोखर आनंद आहे. माझ्या जन्मभूमी आणि कर्मभूमीने माझा गौरव केला. महाराष्ट्र भूषण मिळणाऱ्यांची यादी भली मोठी. त्यात मला स्थान दिले ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. पन्नास वर्षाच्या प्रवासात ज्यांनी मला कळत नकळत का होईना मदत केली आहे, ही सगळी त्यांची किमया आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे रसिक प्रेक्षक. जे आवडले तर डोक्यावर घेतात. रसिकांना आवडलं पाहिजे हाच दृष्टीकोन ठेवला. रसिकांनी प्रेम दिले. ते उपकार मी कधीच फेडू शकणार नाही. माझ्या हृदयात हे प्रेम कायम राहील, अशी भावना यावेळी अशोक सराफ यांनी व्यक्त केली.

**लतादीदींच्या नावे पुरस्कार हा आशीर्वाद : सुरेश वाडकर**

यावेळी मनोगत व्यक्त करताना ज्येष्ठ पार्श्वगायक सुरेश वाडकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. लताजींच्या नावाचा पुरस्कार हा आशीर्वाद आहे. आजही लतादीदी आपल्यात आहेत, हीच भावना असल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक प्रधान सचिव श्री. खारगे यांनी केले. सांस्कृतिक दृष्ट्या समृध्द असे आपले राज्य आहे. महान सांस्कृतिक वारसा जतन आणि संवर्धन करण्यात कलावंतांचा मोठा वाटा आहे. विविध सांस्कृतिक पुरस्कार, महोत्सव आयोजित करून व्यासपीठ निर्माण करण्याचे काम राज्य शासन करीत आहे. तीन वर्षाचे पुरस्कार यावर्षी देत असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस आणि मान्यवरांच्या हस्ते राजकपूर जीवनगौरव पुरस्कार २०२० ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती अरुणा इराणी, सन २०२१ साठी ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती आणि सन २०२२ साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती हेलन यांना प्रदान करण्यात आला. तर राजकपूर विशेष योगदान पुरस्कार सन २०२० साठी ज्येष्ठ दिग्दर्शक जे. पी. दत्ता, सन २०२१ साठी ख्यातनाम गायक सोनू निगम आणि सन २०२२ साठी विधू विनोद चोप्रा यांना प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांच्यावतीने त्यांचे स्नेही श्री. विजय यांनी हा पुरस्कार स्वीकारला. ज्येष्ठ कलावंतांना दिला जाणारा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात आला. सन २०२० साठी ख्यातनाम चित्रपट अभिनेते रवींद्र महाजनी (मरणोत्तर), सन २०२१ साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती उषा चव्हाण आणि सन २०२२ साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती उषा नाईक यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. रवींद्र महाजनी यांचा पुरस्कार त्यांचे पुत्र गश्मिर महाजनी यांनी तर श्रीमती उषा चव्हाण यांच्यावतीने विजय कोंडके यांनी पुरस्कार स्वीकारला. चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार सन २०२० साठी चित्रपट दिग्दर्शक गजेंद्र अहिरे, सन २०२१ साठी ज्येष्ठ पार्श्वगायक रवींद्र साठे आणि सन २०२२ साठी प्रसिद्ध चित्रपट अभिनेते-दिग्दर्शक नागराज मंजुळे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी चित्रपट समीक्षक अशोक राणे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सूत्रसंचलन पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या प्रकल्प संचालक मीनल जोगळेकर यांनी केले तर सांस्कृतिक कार्यक्रम आणि चित्रपट पुरस्कार सोहळ्याचे सूत्रसंचलन अभिनेता अमेय वाघ आणि अभिनेत्री वैदेही परशुरामी यांनी केले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

क्राईम संध्या | रविवार दि. २५ फेब्रुवारी २०२४ ते रविवार दि. ०३ मार्च २०२४ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ५

### भिवंडीतील आदिवासी वस्तीचा पाणी पुरवठा केला बंद

# संतप्त महिलांचा गटविकास अधिकारी कार्यालयात हंडा कळशीसह ठिय्या आंदोलन



**भिवंडी/प्रतिनिधी**

देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना आजही या देशातील मूळ पुरुष म्हणून ओळखला जाणारा आदिवासी समाज असंख्य नागरी सुविधांपासून वंचित असल्याचे चित्र ठिकठिकाणी पाहण्यात येत आहे. आणि अशीच एक घटना भिवंडी तालुक्यात समोर आली असून ग्रामपंचायत हद्दीतील पाणीपट्टी वसुली करणाऱ्या अनधिकृत ग्राम पाणीपुरवठा समितीने आदिवासी वस्ती असलेल्य कुटुंबियांचे पाणी तब्बल तीन महिन्यांपासून बंद केल्याचा संताप जनक प्रकार समोर आला आहे. तालुक्यातील पुंडास या ग्रामपंचायत हद्दीत मोहाचा पाडा असून त्याठिकाणी ३५ आदिवासी कुटुंबीय वास्तव्यास आहेत. या गावत मुंबई महापालिकेच्या पाईप लाईन वरील नळ जोडणीतून पाणीपुरवठा केला जातो. त्याचे पाणीपट्टीचे बिल ग्रामपंचायतीच्या नावाने दिले जाते परंतु गावातील पाणीपट्टी वसुली ही गाव पातळीवरील स्थानिक ग्रामस्थांच्या हातातील ग्राम पाणीपुरवठा समिती करीत असल्याने त्यांनी प्रतिमाह १०० रुपये दिले नसल्याचा आरोप करीत थेट या वस्तीतील पाणीपुरवठा खंडित केला आहे. या घटनेची माहिती स्थानिक महिलांनी श्रमजीवी संघटनेचे प्रवक्ता प्रमोद पवार व तालुकाध्यक्ष सुनील लोणे यांना दिल्या नंतर त्यांनी या महिलांना घेऊन थेट पंचायत समिती कार्यालयात गटविकास अधिकारी डॉ.प्रदीप घोरपडे यांच्या दालनात हंडा कळशी घेऊन दाखल होत आंदोलन केले. मुंबई महानगर पालिका पाणीपुरवठा संबंधित ग्रामपंचायतीस केल्या नंतर पाणीपट्टी त्यांच्या कडून वसूल केली जाते पण तालुक्यातील तब्बल ६८ ग्रामपंचायत हद्दीत अनधिकृत पणे ग्राम विकास समिती पाणीपट्टी वसूल करते असा खळबळजनक आरोप प्रमोद पवार यांनी केला आहे.आदिवासी कुटुंबीयांना पिण्याच्या पाण्याची पासून वंचित ठेवणाऱ्या संबंधित ग्रामपंचायत सरपंच, ग्राम विकास अधिकारी व अनधिकृत पाणीपट्टी वसुली करणाऱ्या विरोधात अट्रोसिटी अंतर्गत गुन्हे दाखल करावेत अशी मागणी तालुकाध्यक्ष सुनील लोणे यांनी केली आहे.

तालुक्यातील अनेक गावातून मुंबई शहराला पाणीपुरवठा करणारी पाईप लाईन जात असल्याने सुमारे ६८ गावांना मुंबई पाईप लाईन मधून ग्रामपंचायतीच्या नावे नळ जोडणी दिली गेली आहे.याची पाणीपट्टी ग्रामपंचायतीच्या कडून वसूल केली जात असताना अनेक ग्रामपंचायतींची लाखो रुपयांची पाणीपट्टी थकीत आहे.पण आश्चर्य करणारी बाब म्हणजे या गावात पाणीपट्टी वसुली करण्याचे काम स्थानिक ग्राम पाणी पुरवठा समिती करीत असतात. परंतु त्याची पावती कोणत्याही कुटुंबीयांना दिली जात नाही.या बाबत २०२१ मध्ये मोठा वाद उत्पन्न झाला असता १५ फेब्रुवारी २०२१ रोजी भिवंडी पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्याकडे झालेल्या बैठकीत ग्रामपंचायत हद्दीतील अनधिकृत पाणी पट्टी वसुली स्थानिक गाव पातळीवरील समिती कडून तात्काळ काढून घेण्याचा निर्णय झाला पण आज पर्यंत त्याची अंमलबजावणी करण्याचा विसर प्रशासनाला पडला आहे.

# गांधीवादी मूल्यशिक्षण प्रसाराच्या दृष्टीने उपयुक्त -डॉ.दिगंबर शिर्के

### शिवाजी विद्यापीठाचा जळगावच्या गांधी रिसर्च फौंडेशनसमवेत सामंजस्य करार



**कोल्हापूर/प्रतिनिधी**

गांधीवादी मूल्यशिक्षण या विषयावरील अभ्यासक्रम सुरू करण्याबरोबरच अनेक उपक्रम गांधी अभ्यास केंद्रामार्फत येत्या वर्षभरात राबविण्यात येऊ शकतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि जळगाव येथील गांधी रिसर्च फौंडेशन यांच्यादरम्यान आज सामंजस्य करार झाला. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी फौंडेशनच्या वतीने संशोधन विभागाच्या अधिष्ठाता डॉ. गीता धर्मपाल, असोशिएट प्रोफेसर डॉ. अश्विन झाला आणि परीक्षा नियंत्रक गिरीश कुलकर्णी उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, जळगावच्या गांधी संशोधन केंद्राला अर्थात गांधी तीर्थाला गतवर्षी भेट देऊन आल्यापासून या संस्थेसमवेत संयुक्तपणे काही उपक्रम राबविता येतील का, याविषयी चिंतन सुरू होते. त्यास आजच्या सामंजस्य कराराच्या रूपाने मूर्तरूप लाभले, ही समाधानाची बाब आहे. महात्मा गांधी यांचा मूल्यविचार, मूल्यशिक्षण आणि नई तालीम आदींवर आधारित दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू करण्याचा मानस आहे. त्यासाठी आवश्यक ई-कन्टेन्टची निर्मिती संयुक्तपणे करता येईल. विद्यापीठातील विद्यार्थी व शिक्षकांनी गांधीतीर्थ येथे जाऊन तेथील फेलोशीप सह शैक्षणिक बाबींचा लाभ घ्यावा. क्रमिक अभ्यासक्रमाच्या जोडीला गांधी विचारांवर आधारित कृतीशील उपक्रमही राबविले जावेत, त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेलाही सामावून घेतले जावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी डॉ. गीता धर्मपाल म्हणाल्या, शिवाजी विद्यापीठासमवेत सामंजस्य करार होणे ही गांधी रिसर्च फौंडेशनसाठी खूप महत्त्वाची बाब आहे. या सामंजस्य कराराअंतर्गत शिवाजी विद्यापीठासमवेत फौंडेशनला संयुक्त संशोधन प्रकल्प हाती घेता येऊ शकतील. गांधींची प्रस्तुतता अधोरेखित करणारे विविध उपक्रम, कार्यशाळा, चर्चासत्रे आदींचे आयोजनही करता येऊ शकेल. यावेळी फौंडेशनच्या गिरीश कुलकर्णी यांनी गांधीतीर्थाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. गांधी विचार संस्कार परिक्षा, नॅशनल गांधीयन लीडरशीप कॅम्, गांधीतीर्थ भेट आदी उपक्रमांच्या माध्यमातून गांधी अभ्यास केंद्राचे सक्षमीकरण करण्यास फौंडेशन मदत करू शकेल, असे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. अशोक चौसाळकर यांनी शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्राच्या वाटचालीविषयी उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. सामंजस्य करारावर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी तर गांधी रिसर्च फौंडेशनच्या वतीने संशोधन विभागाच्या अधिष्ठाता डॉ. धर्मपाल यांनी स्वाक्षरी केल्या. सुरवातीला कुलगुरू डॉ. शिर्के यांनी मान्यवरांचे ग्रंथभेट देऊन स्वागत केले. तर, फौंडेशनच्या वतीने कुलगुरूंना गांधी पुतळा आणि सुतीहार प्रदान करण्यात आला. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले व आभार मानले.

# काँग्रेस पर्यावरण विभागाचे पालिकेसमोर २८ फेब्रुवारीला बेमुदत उपोषण

**वसई/प्रतिनिधी**



महाराष्ट्र प्रदेश पर्यावरण विभागाचे अध्यक्ष समीर वर्तक हे येत्या २८ फेब्रुवारी रोजी पालिकेने दिलेली आश्वासने न पाळल्याने पालिकेसमोर बेमुदत उपोषणाला बसणार आहेत. वसई तालुक्यातील पूर्वी मंजूर झालेली लगतच्या गावांमधील ६९ गावांची पाणी योजना मार्गी लागली नसून, वसईरोड दिवाणमान येथील सर्वधर्मीय स्मशानभूमीचा प्रश्नही सुटलेला नाही. पावसाळ्यात जलमय परिस्थिती उद्भवू नये म्हणून निरी व आयआयटी या संस्थेच्या आधीच्या सर्वेक्षण अहवालानुसार पालिका क्षेत्रात होल्डिंग पॉन्डची निर्मिती करावी. या मागण्यांसाठी त्यांची पूर्तता न झाल्याने समीर वर्तक पालिकेच्या निषेधार्थ उपोषण करणार आहेत. मनपा नागरिकांना सेवा देण्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून नागरिकांच्या जगण्या मरण्याशी निगडित असलेले प्रश्नही लेखी आश्वासन देण्यापलीकडे सोडवत नाहीत. २३ डिसेंबर २०२० रोजी काँग्रेस आणि पर्यावरण संवर्धन समिती, वसई विरारच्या माध्यमातून करण्यात आलेल्या समीर वर्तक व सामाजिक कार्यकर्ते मॅकेन्झी डाबरे यांच्या बेमुदत उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी तसेच १ जून २०२३ रोजी एवूण २८ महत्त्वाच्या प्रलंबित प्रश्नांसाठी समीर वर्तक यांच्या नेतृत्वाखाली काढलेल्या मोर्चाच्या वेळी मनपातर्फे लिखित स्वरुपात आश्वासन देण्यात आले होते. परंतु एकही प्रश्न सोडवण्यात मनपाला यश आलेले नाही. वसईतील ६९ गावांची पिण्याच्या पाण्याची योजना जून २०२१ पर्यंत कार्यान्वित करण्याचे कळविले होते.परंतु ही योजना आजतागायत चालूच झालेली नाही.

# शांतीनगर पोलिसांनी तिघा सराईत चोरट्यांना ठोकल्या बेड्या; लाखोंचा मुद्देमाल हस्तगत

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडी शहरात वाहन चोरीच्या घटना वाढलेल्या असताना शांतीनगर पोलिस पथकाने गुप्त माहितीच्या आधारे केलेल्या तीन वेगवेगळ्या कारवाईत तिघा सराईत चोरट्यांना अटक करण्यात यश मिळवले असून त्यांच्या जवळून चार रिक्षा, सहा दुचाकी व एक मोबाईल असा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळवले आहे. भिवंडी शहरातील वाढलेल्या दुचाकी चोरीच्या घटनांचा शोध घेण्याचे आदेश पोलिस उपायुक्त श्रीकांत परोपकारी यांनी दिल्या नंतर शांतीनगर पोलिस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर इंदलकर, गुन्हे विभागाचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) विक्रम मोहिते यांचे मार्गदर्शना खाली तपास पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे, पोलिस हवालदार संतोष मोरे, रिजवान सैय्यद, पोलिस नाईक श्रीकांत धायगुडे, किरण मोहिते, पोलिस शिपाई दिपक सानप, रूपेश जाधव, मनोज मुके, प्रशांत बर्वे यांनी गुप्त बातमीदारा कडून मिळालेल्या माहिती नुसार नाशिक मालेगाव येथील संशयित इसम मोहम्मद अरफाद मोहम्मद आरीफ अन्सारी (२१), हा भिवंडी परिसरात येवून रिक्षा चोरी करीत असल्याचे समजल्याने त्याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेत त्याचेकडे कसून तपास केला असता त्याने भिवंडी, मानपाडा डोंबिवली व मालेगांव, नाशिक अशा वेगवेगळ्या परिसरातुन चोरी केलेल्या एकूण चार रिक्षा व एक दुचाकी चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. दुसऱ्या घटनेत शांतीनगर पोलीस ठाणे हद्दीतील तडीपार असलेला आरोपी मकसुद दस्तगीर अंसारी (२२) यास ताब्यात घेवुन त्याच्या कडे केलेल्या तपासात त्याने शांतीनगर, निजामपूर, भिवंडी शहर पोलिस ठाणे हद्दीतून चोरी केलेली एकूण चार पाच दुचाकी जप्त करण्यात यश मिळवले आहे. तर तिसऱ्या घटनेत सराईत गुन्हेगार जुनैद उर्फ गुलाब अहमद मोहम्मद हनीफ शहा (२०) यास ताब्यात घेऊन त्याचेकडे केलेल्या चौकशीत त्याने शांतीनगर पोलीस ठाणे हद्दीत मोबाईल चोरीच्या गुन्ह्याची उकल करण्यात यश मिळवले आहे.

# डहाणू महोत्सवाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील -रविंद्र चव्हाण

**पालघर/प्रतिनिधी**



डहाणू क्षेत्र पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे ठिकाण असून या ठिकाणी पायाभूत सुविधा उपलब्ध करून पर्यटनाच्या दृष्टीने आकर्षनाचे केंद्र बनेल. डहाणू महोत्सवाच्या माध्यमातून पर्यटन क्षेत्रामध्ये रोजगारांच्या संधी उपलब्ध होतील असे सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. डहाणू महोत्सव २.ज चा शुभारंभ पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते झाला त्यातेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, आमदार सुनिल भूसारा, विनोद निकोले, लोकप्रतिनिधी तसेच नागरिक आणि पर्यटक उपस्थित होते. पालघर डोंगरी, सागरी, नागरी क्षेत्र लाभलेला जिल्हा असून डहाणू क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात सागरी किनारा लाभला असून त्यामुळे डहाणू हे पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र बनले आहे. पर्यटनाला चालना देण्यासाठी वॉटर स्पोर्टस् येणाऱ्या काळात सुरू होईल. डहाणू महोत्सवामध्ये पर्यटक विविध स्पॉटला भेटी देऊन इच्छीत साहित्य खरेदी करत आहेत. नविन उद्योजकांना या महोत्सवाच्या माध्यमातून व्यवसाय वृध्दीची संधी उपलब्ध होणार आहे. या महोत्सवामध्ये विविध राज्यातील पर्यटकांनी हजेरी लावली असून स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली असल्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी सांगितले.

## कार व मोटरसायकल अपघातात एकाचा मृत्यू

**देवणी/प्रतिनिधी**



तालुक्यातील तळेगाव भोगेश्वर येथील रहिवासी अंकुश मोहन म्हेत्रे (३०) यांचा भालकी तालुक्यातील सावळी संगम रोडवर अपघातात होऊन जागीच मृत्यू झाल्याची घटना दि.२४ रोजी दुपारी १२च्या सुमारास घडली. देवणी तालुक्यातील तळेगाव येथील अंकुश मोहन म्हेत्रे हा भालकी तालुक्यातील धानोर येथे सासुरवाडीला जात असताना उदगीर बिदर रोडवर सावळी संगम जवळ समोरून येणाऱ्या गाडी क्र. KA 38 M 6030 या समोरन येणाऱ्या कारला MH 24 BV 2719 या क्रमांकाच्या दुचाकीवरून जात असताना समोरा समोर धडक होऊन मोटारसायकल चालक अंकुश मोहन म्हेत्रे याचा जागीच मृत्यू झाला. मृत अंकुश हा आपल्या एका महिन्यापूर्वी डिलिव्हरी झालेल्या पत्नीकडे मुलाला पाहण्यासाठी जात होता. त्याच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, एक महीण्याचा मुलगा असा परिवार आहे.

## वसई-विरार पालिकेचा प्रशासकीय कारभार अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांच्या हाती

**विरार/प्रतिनिधी**



वसई विरार महापालिकेचे आयुक्त भारतीय प्रशासकीय सेवेच्या प्रशिक्षणासाठी एक महिन्याच्या कालावधीसाठी मसुरी येथे रवाना झाले आहेत. त्यांच्या अनुपस्थितीत अतिरिक्त आयुक्तांकडे कार्यभार सोपविण्यात आला आहे. मात्र त्यांच्याकडे वित्तीय आणि प्रशासकीय अधिकार नसल्याने मोठे पेच निर्माण झाला आहे.वसई विरार महापालिकेचे विद्यमान आयुक्त अनिलकुमार पवार यांची भारतीय प्रशासन सेवेमध्ये (आएएस) पदोन्नती नियुक्ती करण्यात आली आहे. यासाठी त्यांची पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी मसुरी येथील लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकदमीसाठी पाठविण्यात आले आहे. १९ फेब्रुवारी ते १९ मार्च या कालावधीत हे प्रशिक्षण चालणार आहे. त्यामुळे राज्य शासनाने त्यांना कार्यमुक्त केले असून त्यांच्या जागी प्रशासकीय कारभार अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. मात्र वित्तीय आणि महत्वाचे प्रशासकीय निर्णय वगळून त्यांना हा कार्यभार सोपविण्यात आल्याने मोठी अडचण निर्माण झाली आहे. वित्तिय अधिकार नसल्याने त्यांना कुठलेही आर्थिक काम घेता येणार नाही. दैनंदिन खर्चासाठी देखील निविदा काढता येणार नाही. या महिन्याभराच्या काळात ठेकेदारांची देयके देखील थकीत राहणार आहे. ३१ मार्च २०२४ रोजी आर्थिक वर्ष संपणार असल्याने प्रस्तावित कामे खोळंबणार आहे. शासकीय अनुदानातून प्रस्तावित कामे करता येणार नसल्याने अनुदाने देखील परत जाणार आहे. आगामी पावसळ्यापूर्वी करावयाच्या कामाचे देखील नियोजन करता येणार नाही. यामुळे कामे कशी करायची असा प्रश्न पडला आहे.


**वसई-विरार शहर महानगरपालिका**

**प्रभाग समिती 'आय' कार्यालय, वसई**

**जाहिर नोटीस**

वसई-विरार शहर महानगरपालिका सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, खालील नमूद मिळकत धारकांनी मामलत्ता हस्तांतरण करणेकामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे प्रभाग समिती-आय कार्यालयात सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत/ तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात कागदपत्रासह नोंदवावी. सदर बाबतीत कोणतीही हरकत/तक्रार न आल्यास कार्यालयामार्फत पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | वसई | VV02/11008 | गोविंद बी लाड महेश गो लाड | प्रकाश गोविंद लाड |
| २. | वसई | VV03/20252/67 | पिमेंटा डेव्हलपर्स | डेब्रा मॅटिल्डा लोबो व मन्सूर समद मेमन |
| ३. | वसई | VV21/11193 | शामलाल शंकरलाल शर्मा | अमित श्यामलाल शर्मा |
| ४. | वसई | VV17/17453 | राजेश्री जगदीश वैती | पुष्पा योगेश चव्हाण व योगेश प्रकाश चव्हाण |
| ५. | वसई | VV01/19146 | पूनम मारीयो डिसील्वा | विनय दत्तात्रय म्हात्रे व दत्तात्रय हरिश्चंद्र म्हात्रे |
| ६. | वसई | VV09/18642 | समीर लक्ष्मण चव्हाण | प्रभाकर रामचंद्र बाबर व प्राजक्ता प्रभाकर बाबर |
| ७. | वसई | VV03/20254/9 | रुबी डेव्हलपर्स | वनीता हेमंत लाड |
| ८. | वसई | VV19/1056 | आगोस्तीन डॉमणिक करवालो | नेव्हील आगोस्टीन करवालो |
| ९. | वसई | VV18/9251 | सुनिता गणेश देसाई | गणेश जगन्नाथ देसाई व मनिषा गणेश देसाई व जिदन्यासा गणेश देसाई |
| १०. | वसई | VV19/19996/14 | शुभांगी अभय पाटील व आशुतोष अभय पाटील | संतोष एस. ठाकुर, कल्पीता संतोष ठाकुर |
| ११. | वसई | VV15/14645 | फ्रान्सिस सिफर्यांनस आल्फ्रांन्सो | संदीप फ्रान्सिस अल्फान्सो व रोजेलीन संदीप अल्फान्सो |
| १२. | वसई | VV21/9085 | संगम बिल्डर्स | अनवरी आशिक अली |
| १३. | वसई | VV09/20253/17 | संध्या आनंद पुराणिक व आनंद रघुनाथ पुराणिक | रिचर्ड सावरोक बुदुल |
| १४. | वडवली | VD01/747/21 | सुर्या सी. खबाल | संदिप कुमार यादव |
| १५. | वडवली | VD01/289 | शांताराम नवश्या भवर | कुंदा राजेंद्र कदम |
| १६. | चोबारे | CB01/163 | रमेश कृष्णा घुटे | दिनेश रमेश घुटे |
| १७. | वडवली | VD01/546-4 | तेजस सुखलाल पाटील | लिना प्रविण बोरर्लेकर |
| १८. | मुळगाव | ML01/44 | पॉल गब्रेल घोसाल | शरॉल आल्वीस घोन्सालविस |
| १९. | वसई | VV10/9031 | घोंडी राघो जाधव | संगिता अनिल जाधव |
| २०. | वसई | VV17/17006 | कल्पना जयस्वाल | हेमंत गणेश पालवणकर व ऋतु हेमंत पालवणकर |
| २१. | वसई | VV17/17021 | डेनिस डाबरे | दक्षा चंद्रशेखर हिंदळेकर व चंद्रशेखर जयवंत हिंदळेकर |
| २२. | वसई | VV10/15105 | सरोज शैलशकुमार | मोहम्मद युसुफ शेख |

जा.क्र. : वविशम/कर विभाग/वसई/४६३७/२०२३-२४

दिनांक : २०/०२/२०२४

**सही/-**

**प्र.सहा.आयुक्त**

**प्रभाग समिती 'आय'**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**

25 FEBRUARY TO 03 MARCH 2024 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 2/24/2024 8:36 PM Page 1



# मोटारसायकल व मोबाईल चोरणाऱ्या टोळीच्या आवळल्या मुसक्या; मुद्देमाल जप्त

**लातूर/आंबदास करकरे**

लातूर जिल्ह्याच्या विविध पोलीस स्टेशन अंतर्गत मोटरसायकली व मोबाईल चोरणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी सहा जणांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून चोरीचे २१ मोबाईल, ११ मोटर सायकली,१ लॅपटॉप असा एकूण ०८ लाख ३२ हजार रुपयाच्या मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीमधून मोटार सायकल चोरून नेल्याची घटना घडली होती. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हे दाखल झाला होता. तसेच इतर पोलीस स्टेशनला देखील मोटर सायकल, मोबाईल चोरीचे गुन्हे दाखल होते. सदरचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी आदेशित केले होते. त्यावरून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथके तयार करून त्यांना सखोल मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या होत्या. सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना मोठ्या प्रमाणात बातमीदार नेमून तसेच तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेण्यात येत होते. वरिष्ठांचे मार्गदर्शनात सदरच्या पथकांनी केलेल्या परिश्रमामुळे पथकांना गुप्त बातमीदाराकडून मोटार सायकल व मोबाईल चोरीचे गुन्हे करणाऱ्या आरोपींची माहिती मिळाली. सदर माहितीची बारकाईने अभ्यास व विश्लेषण करून मोटर सायकल व मोबाईल चोरी करून ते मोबाईल कमी किमतीत लोकांना विकणाऱ्या आरोपींची टोळी निष्पन्न करून, टोळीतील सदस्यांना त्यांच्या राहते ठिकाणाहून ताब्यात घेण्यात आले आहे. सदर पथकांनी अतिशय कुशलतेने व उत्कृष्टपणे नमूद गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन खालील आरोपींना चोरी केलेला १ लॅपटॉप, ११ मोटरसायकली व २१ मोबाईलसह ताब्यात घेण्यात आले. अक्षय प्रभाकर कणसे (२८), समाधान बाळासाहेब जाधव (२०), सद्दाम हुसेन शेख (२४), राम उर्फ लखन सुधाकर संदीले (२४), महेश नामदेव नरहरे (२१), आशिष गोविंद पवार (२४) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी त्यांच्या आणखीन तीन साथीदारासह लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोबाईल व मोटार सायकल चोरीचे गुन्हे केल्याचे कबुल केले. नमूद आरोपीनी विविध गुन्ह्यात चोरलेला मुद्देमाल १ लॅपटॉप, २१ मोबाईल व ११ मोटारसायकली असा एकूण ८ लाख ३२ हजार ५०० रुपयाचा मुद्देमाल हजर केल्याने वरील आरोपींना नमूद गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. तसेच फरार आरोपींचा शोध सुरू आहे. सदर कारवाईत पोलीस ठाणे एमआयडीसी, पोलीस ठाणे शिवाजीनगर, पोलीस ठाणे गांधी चौक,पोलीस ठाणे विवेकानंद, पोलीस ठाणे भादा, तसेच पोलीस ठाणे कळंब जिल्हा धाराशिव येथील १ गुन्हा असे एकूण ८ मोटरसायकल व मोबाईल चोरीचे गुन्हे उघड झाले असून चोरीचे आणखीन गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे एमआयडीसी करीत आहेत. वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस पथकांनी अतिशय उत्कृष्टरित्या तपास करून मोटार सायकल व मोबाईल चोरणाऱ्या आरोपींच्या मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस अमलदार माधव बिल्लापट्टे, नवनाथ हासबे ,रियाज सौदागर, मोहन सुरवसे, राजाभाऊ मस्के, तुराब पठाण, जमीर शेख, राहुल सोनकांबळे, मनोज खोसे, राहुल कांबळे, नितीन कठारे, संतोष खांडेकर,नकुल पाटील यांनी केली आहे.




# महिला बचत गटासाठी नेतृत्व विकास प्रशिक्षण संपन्न




**औसा/प्रतिनिधी**

तालुक्यातील करजगाव येथे नाबार्ड व ग्रामीण जनता शिक्षण प्रसारक मंडळ, चलबुर्गा यांच्या संयुक्त विद्यमाने औसा तालुक्यातील बचत गटाच्या पदाधिकारी व सदस्यां करिता नेतृत्व विकास प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन नाबार्डचे जिल्हा विकास प्रबंधक प्रमोद पाटील यांच्या हस्ते झाले. अध्यक्ष स्थानी ग्रामीण जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.दत्तात्रय सुरवसे हे होते. या प्रशिक्षणात स्वयं सहाय्यता गटाची आचारसंहिता, गटाची आदर्श बैठक, गट प्रमुख म्हणून त्यांच्या अंगी असणारे गुण विकसित करणे व दोष दूर करणे, पदाधिकारी भूमिका व जबाबदारी, गटाचे उद्योग व्यवसाय इत्यादी अनेक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी गंगासागर राऊतराव, गिरीश सबनीस यांनी साधन व्यक्ती म्हणून काम केले. सूत्रसंचालन पार्वती बेडचे यांनी केले. मनिषा जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. आभार प्रदर्शन सुनील सूर्यवंशी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिकेत हाणकुने व ग्रा.पं. सदस्य शीतल जाधव-पाटील यांनी परिश्रम घेतले.

पान ३ वरून....

## लग्न होईना म्हणून बापावर...

नसल्याचा राग मनात धरुन हताश झालेल्या तरुणाने आपल्या जन्मदात्याचा खून केल्याने हळहळ व्यक्त करण्यात आली. जळगाव जिल्ह्याच्या यावल तालुक्यातील पिळोदा खुर्द या गावी रतन तानसिंग कोळी हे वयोवृद्ध जेष्ठ नागरिक पत्नी सुभाबाई कोळी हिच्यासोबत रहात होते. रतन कोळी यांच्या पहिल्या पत्नीचे सुमारे चाळीस वर्षापुर्वी निधन झाले होते. पहिल्या पत्नीच्या निधनानंतर रतन कोळी यांनी सुभाबाई सोबत दुसरे लग्न केले होते. पहिल्या पत्नीपासून रतन कोळी यांना तिन मुली झाल्या होत्या. या तिन्ही मुलींचे लग्न झाले असून त्या आपल्या सासरी सुखाने संसार करत आहेत. दुसरी पत्नी सुभाबाई हिच्यापासून रतन कोळी यांना दोन मुले झाली. सुभाबाईपासून झालेला मोठा मुलगा प्रविण याचे देखील लग्न झाले होते. तो जळगाव येथे आपल्या पत्नीसोबत संसारात मग्न होता. गावी पिळोदा खुर्द येथे रतन कोळी हे पत्नी सुभाबाई आणि दुसरा अविवाहीत मुलगा देवानंद अशांसोबत रहात होते. सर्वांचे विवाह झाले. सर्वजण आपल्या संसारात मग्न असल्याचे बघून आपला देखील विवाह व्हावा अशी इच्छा देवानंद मनाशी बाळगून होता. त्यात काही गैर नव्हते. देवानंद हा मजुरी करत होता. त्यामुळे त्याचे उत्पन्न फारसे नव्हते. गावी पिळोदा येथे आई वडील आणि लहान मुलगा देवानंद असे तिघेच जण रहात होते. आपल्या घरात पत्नीच्या रुपात चौथा सदस्य यावा अशी देवानंद मनोमन इच्छा बाळगून होता. त्यासाठी तो वडील रतन कोळी यांच्याकडे तगादा लावत होता. मात्र लग्नासाठी रतन कोळी पैसा खर्च करण्यास तयार नव्हते. माझ्याकडे तुझ्या लग्नासाठी पैसे नाही असे ते त्याला सांगत होते. त्यामुळे देवानंदचे लग्न होत नव्हते. त्यामुळे देवानंद त्यांच्यावर चिडून होता. त्यातून घरात वाद विवाद सुरु होते. अखेर १४ जानेवारी रोजी एक अघटीत घटना घडली. १४ जानेवारी रोजी रात्रीचे जेवण आटोपून वयोवृद्ध रतन कोळी, त्यांची वयोवृद्ध पत्नी सुभाबाई आणि तरुण मुलगा देवानंद असे तिघेही झोपले होते. घराच्या ओसरीत रतन कोळी, एका खोलीत सुभाबाई आणि बाजूच्या खोलीत देवानंद असे झोपले होते. रात्री अकरा वाजेच्या सुमारास सुभाबाई जागीच होती. त्याचवेळी संतापलेल्या देवानंदच्या मनात वडील रतन कोळी यांच्याबद्दल राग उफाळून आला. देवानंद याने हातात कुऱ्हाड घेतल्याचे जागी असलेल्या सुभाबाईने पाहिले. काही कळण्याच्या आत ओसरीत झोपलेल्या रतन कोळी यांच्या डोक्यात देवानंद याने कुऱ्हाडीचे घाव घालण्यास सुरुवात केली. झोपेच्या अधीन झालेल्या रतन कोळी यांच्या डोक्यावर कुऱ्हाडीचे दोन ते तिन घाव बसल्यामुळे त्यांचे डोके फुटले व त्यातून रक्त वाहू लागले. रतन कोळी यांनी जागीच आपला जीव सोडला. काही क्षणात होत्याचे नव्हते झाले. आपल्या हातून आपल्या बापाची हत्या झाल्याचे बघून देवानंद याने घटनास्थळावरुन पलायन केले. आपल्या पतीची आपल्याच मुलाकडून हत्या झाल्याचे आणि तो पळून गेल्याचे बघून सुभाबाईने मध्यरात्री आक्रोश करण्यास सुरुवात केली. सुभाबाईचा एवढ्या रात्री सुरु असलेला आक्रोश ऐकून शेजारचे लोक त्याठिकाणी जमा झाले. जमलेल्या सर्वांनी घटनास्थळी असलेले विदारक चित्र पाहिले. या घटनेप्रकरणी सुभाबाई कोळी हिने दिलेल्या फिर्यादीनुसार यावल पोलिस स्टेशनला तिचा मुलगा देवानंद कोळी याच्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गु.र.न. ९/२४ भा.द.वि. ३०२ नुसार दाखल गुन्ह्याचा पुढील तपास फौजदार राजेंद्र साळुंखे करत आहेत.

## शुल्लक वादातून आदम सुडाने ...

पिण्यासाठी जात होता. गुन्हेगारी प्रवृतीच्या मित्राशी त्याची जास्त जवळीक वाढली होती. त्यामुळे तो कामावर कमी आणि त्याचेसोबत जास्त फिरत होता. त्यामुळे त्याच्या घरचे लोक ही त्याच्या व्यसनाने कंटाळलेले होते. घरातून बाहेर गेलेला प्रशांत हा रात्री अपरात्री कधी ही घराकडे येत होता. गेल्या काही दिवसापूर्वी नमाजगे मळा येथील आदम मुजावर हा आपले मित्र अजय काशीद आणि साहिल चव्हाण याच्या सोबत रात्रीच्या वेळी कत्तलखान्याजवळील रस्त्यावरून आपल्या बाईकवरून चालला असताना त्याच्या बाईकने प्रशांत कुराडे याच्या गाडीला कट मारला होता. प्रशांतच्या गाडीचे किरकोळ प्रमाणात नुकसान झाले होते. त्यातच आदम चालवित असलेल्या दुचाकीला लाईट नव्हते. ते तिघे ही त्यावेळी फुल्ल दारूच्या नशेत होते. त्यांनीच प्रशांतला कट मारला असला तरी त्यावेळी त्या तिघांनी ही प्रशांतला दादागिरी करून ते निघून गेले. प्रशांतने ही त्यांना त्यावेळी बघून घेण्याची भाषा केली होती. कुंभार गल्ली नेहरू नगर येथील अजय काशीद आणि नमाजगे माळ येथील आदम मुजावर तसे दोघे ही पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार होते. तर साहिल चव्हाण याच्यावर ही खूनाचा गुन्हा दाखल होता. मागील एक दीड वर्षापूर्वी साहिल चव्हाण याने कत्तलखान्याजवल असणाऱ्या निर्जन जागी एका मुंबई येथील तरूणाच्या दारू पिण्याच्या वादातून त्याच्या डोक्यात दगड घालून खून केला होता. सध्या तो या गुन्हयातून जामीनावर बाहेर होता. तिघे ही सराईत गुन्हेगार असल्याने ते कोणाला ही भीत नव्हते. प्रशांतला त्यानी कट मारून खाली पाडले असल्याने प्रशांतने ही त्यांना बघून घेण्याची भाषा केली. प्रशांतने ज्यावेळी त्यांना दादागिरीची भाषा वापरली त्यावेळी ते तिघे ही समजून चुकले की तो काही कच्चा गुरूचा चेला नाही. तो ही आपल्यातीलच एक आहे असे म्हणत आदमने सॉरी भावा, म्हणत त्याला त्यावेळी दारू प्यायला नेले. त्यानंतर ते चौघे ही दारू प्यायला एकत्र येत असल्याने त्यांच्यात मैत्रीचे संबंध निर्माण झाले. परंतु आदम आणि साहिल याच्या मनात प्रशांत विषयी तेढ निर्माण झाली होती. त्याने आपल्याला दादागिरीची भाषा केली असल्याने ते त्याला विसरले नव्हते. शनिवार दि.१० फेब्रुवारी रोजी प्रशांत हा नेहमीप्रमाणे रात्रीच्या सुमारास घरातून बाहेर गेला. त्यावेळी त्याला कोल्हाटी समाजाच्या स्मशानभूमीजवळील कत्तलखान्या जवळ आदम मुजावर, अजय काशिद आणि साहिल चव्हाण हे तिघेजण भेटले. त्या तिघांच्या मनात प्रशांत कुराडे विषयी राग हा होताच. त्यांनी त्याला चल दारू प्यायला असे म्हटले.त्यावेळी कळत नकळतपणे प्रशांतने दारू पिण्यासाठी हो म्हटले.ते चौघे ही दारू पिण्यासाठी कोल्हाटी समाजाच्या स्मशानभुमीत गेले. तेथे त्यांनी रात्रीच्या अंधारात एका भिंती कडेला दारू पिण्यास बसले. दारू पित असताना त्या तिघांनी ही प्रशांतला भरपूर दारू पाजली. त्या तिघांच्या ही मनात वेगळेच होते. दारूच्या नशेत साहिल याने प्रशांतला तु आम्हाला दादागिरी करून बघून घेण्याची भाषा करतोस काय? तु मला अजून ओळखले नाहीस असे म्हणत त्याच्या बरोबर वाद घालायला सुरूवात केली. त्याचा वाद वाढतच चालला. दारूच्या नशेत त्या तिघांनी त्याला अर्वाच्च भाषेत शिव्या देत मारहाण केली. प्रशांतने त्यांना विरोध करीत त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या तिघांनी त्याला बेदम मारहाण केली. त्या तिघांनी त्याला मरेपर्यंत मारहाण केली. त्याच्या झटापटीत प्रशांतचे डोके भिंतीला जोरात आपटल, तो खाली पडला. त्यावेळी साहिल चव्हाण याने खाली पडलेल्या प्रशांतच्या डोक्यात बाजुलाच पडलेला सिमेंटचा तुकडा त्याच्या डोक्यात घातला. प्रशांतच्या डोक्याला मार लागून मोठी जखम झाली. त्यातून मोठया प्रमाणात रक्तस्राव सुरू झाला. त्यातच आदम मुजावर याने परत प्रशांतच्या चेहऱ्यावर परत एक सिमेटचा दगड घातला. प्रशांत हा तडफडत होता. तो मेला आहे याची खात्री करून त्याच्या अंगावर शेजारीच पडलेले नारळाच्या झाडाच्या झावल्या टाकून त्याचा मृतदेह झाकून टाकला. या झटापटीत आदम मुजावर याच्या हाताला मार लागल्याने त्याच्या ही हातातून रक्त येवू लागले होते. त्याला मारून ते तिघे ही परत तेथून जवळच असणाऱ्या डोंबार वाडयातील एका दारू अड्ड्यावर गेले. तेथे त्या तिघांनी परत मनसोक्त दारू प्यायली. तेथे असणाऱ्या दारू विक्रेत्या इसमाने आदम याला विचारले की तुझ्या हाताला काय लागले आहे. त्यावर दारूच्या नशेत असणाऱ्या आदम याने उदया माझी पेपरात मोठी बातमी येईल असे त्याला म्हटले. तेथे दारू पिऊन ते तिघे ही वेगवेगळ्या दिशेने गेले. इकडे दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी दुपारी ११ वाजणेच्या सुमारास कत्तलखान्याजवळील स्मशानभुमीत एक इसम कचरा वेचण्यासाठी गेला असता त्याला स्मशानभूमीच्या भिंती कडेला एका तरूणाचा मृतदेह नारळाच्या पाल्यांनी झाकून टाकला असल्याचे दिसले. त्याने ही घटना बाहेर येवून लोकांना सांगितली. लोकांनी स्मशानभूमीत आत जावून पाहिले असता. तेथे एकाचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात झाकून ठेवल्याचे दिसले. बघता बघता ही खूनाची बातमी शांतीनगर, लाखेनगर, इंदिरानगर येथील लोकांना समजल्यावर त्यांनी घटनास्थळी एकच गर्दी केली. कुणी तरी या घटनेची माहिती जवळच असणाऱ्या इचलकरंजी शहर पोलीस स्टेशनला दिली. या घटनेची माहिती मिळताच पो.निरी. प्रवीण खानापुरे हे आपल्या सहकार्यासह घटनास्थळी पोहचले. घटनास्थळी स्मशानभुमीच्या भिंतीला लागून नारळाच्या पाल्याखाली एका तरूणाचा मृतदेह असल्याची खात्री केली. त्यावर एक खांब ही होता. तो खांब बाजुला करून पोलीसांनी तपासाला सुरूवात केली. घटनास्थळी ठेस तज्ञांना ही पाचारण करण्यात आले. मारेकऱ्यांनी मृतदेह ओळखू नये म्हणून त्याच्या चेहऱ्यावर आणि डोक्यावर सिमेंटचा दगड घातला असल्याचे दिसत होते. बाजुलाच असणाऱ्या झाडावर ही रक्ताचे डाग उडालेले दिसत होते. घटनास्थळी दारूच्या बाटल्या, चकणा आणि झटापटीच्या खुणा दिसत होत्या. गर्दीतील लोकांनी मयत तरूण हा ओळखीचा आणि जवळच असणाऱ्या इंदिरानगर परिसरातील असल्याचे वाटत होते. पोलीसांनी जमलेल्या लोकाकडून माहिती घेतली असता त्यांनी मयत तरूणाच्या बहिणीला घटनास्थळी बोलावून घेतले. तिने मयत तरूण हा आपला भाऊ प्रशांत कुराडे असल्याची माहिती मृतदेह ओळखून पोलीसांना सांगितले. मृतदेहाची ओळख पटल्यावर पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. गेल्या आठ पंधरा दिवसातील इचलकरंजी शहर परिसरातील ही खूनाची दुसरी घटना होती. घटनास्थळाला पोलीस उपाक्षिक समीरसिंग साळवे यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेऊन पोलीसांना तपासाच्या सुचना दिल्या.या घटनेचा पंचनामा करून मृतदेह उतरीय तपासणीसाठी इंदिरा गांधी रुग्णालयात पाठवून देण्यात आला.तेथे ही प्रशांतच्या नातेवाईकांनी आणि मित्रांनी एकच गर्दी केली. इकडे या घटनेचा तपास इचलकरंजी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस आणि कोल्हापूर स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस करीत होते. या घटनेतील संशयीत आरोपी हे पोलीस रेकॉर्डवरील सरईत गुन्हेगार असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. घटनेच्या आदल्या रात्री प्रशांत कुराडे याला काही जणांनी आदम मुजावर आणि अजय काशीद याच्या बरोबर बघितले होते. यावरून पोलीसांनी त्याचा शोध घ्यायला सुरूवात केली असता आदम मुजावर आणि अजय काशीद हे दोघे जयसिंगपुर बस स्टॅन्डवर असल्याची गोपनीय माहिती पोलीसांना मिळाली. स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पोलीसांनी जयसिंगपुर बस स्टॅन्डवर सापळा लावून पळून जाण्याच्या तयारीत असणाऱ्या आदम मुजावर आणि अजय काशीद यांना ताब्यात घेतले. त्यांना इचलकरंजी शहर पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबुल करून प्रशांत कुराडे याचा खून साहिल चव्हाण याच्या मदतीने केला असल्याची माहिती दिली. या घटनेची लेखी फिर्याद मयत प्रशांत कुराडे याच्या बहिणीने इचलकरंजी शहर पोलीसात दिल्याने पोलीसांनी प्रशांत भैरू कुराडे (वय २८) याच्या खून प्रकरणी आदम मुजावर (वय २३) रा.नमाजगे मळा इचलकरंजी, अजय काशीद (वय२२) रा.नेहरू नगर इचलकरंजी आणि साहिल चव्हाण (वय २५) याच्या विरोधात भाद.वी. कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून आदम मुजावर आणि अजय काशीद यांना इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले. मा. न्यायालयाने या दोघांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेतील तिसरा मुख्य संशयीत आरोपी साहिल चव्हाण हा फरार असल्याने कथा शब्द होईपर्यंत पोलीस त्याचा शोध घेत होते. या घटनेचा तपास पो.निरी.प्रवीण खानापुरे,पो. निरी. रवींद्र कळमकर, पो.उप. निरी.शेष मोरे, संदिप जाधव, राजु शिंदे, खंडेराव कोळी, सचिन देसाई, तुकाराम राजगिरे, महेश खोत, संजय इंगोले, आयुब गडकरी, अमर शिरढोणे, नवनाथ कदम, सुशिल पाटील यांनी केला.

पान ८ वरून....

## गडकोट, किल्ले हा आपला ठेवा...

त्यामुळे त्यांच्या तलवारीला रक्ताचा वास येत नाही तर मानवतेचा सुगंध येतो. ते केवळ व्यक्ती नाही तर विचार होते. शिवरायांकडील एक तरी गुण आपण सर्वांनी घेतल्यास शिवजयंती साजरी करताना त्यांना हेच खरे अभिवादन ठरेल. त्यामुळे समाज, राज्य, देश आणि माणूस म्हणून आपण अधिक प्रगती करू, असेही मुख्यमंत्री म्हणाले. प्रारंभी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शिवजन्मस्थानी पारंपरिक वेशातील महिलांनी शिवरायांची महती सांगणारा पाळणा गायिला. राष्ट्रगीत तसेच 'गर्जा महाराष्ट्र माझा' या राज्यगीताची धून पोलीस बँड पथकाने वाजवून सलामी दिली. त्यानंतर पोलीस पथकाने बंदुकीच्या तीन फैरी झाडून छत्रपती शिवरायांना मानवंदना दिली. यावेळी जिल्हा परिषद शाळा मुथळने येथील लहान विद्यार्थ्यांच्या बाल पथकाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रसंग सुंदर पद्धतीने सादर केले. त्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी बालशिवाजी व जिजाऊंच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची पालखी वाहीली. विजय घोगरे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास प्रांताधिकारी गोविंद शिंदे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब मुळे यांच्यासह शिवभक्त उपस्थित होते.

**शिवाई देवराई मार्गदर्शक ठरेल- मुख्यमंत्री**

शिवनेरी संवर्धन आणि विकास प्रकल्पांतर्गत वन विभागाच्यावतीने किल्ले शिवनेरीवर अडीच एकर क्षेत्रावर तीन वनोद्यान व स्वतंत्र शिवाई देवराई' विकसित करण्यात आली आहे. देवराईची संकल्पना सह्याद्री गिरीभ्रमण संस्थेची असून संस्थेच्या माध्यमातून जैन इरिगेशनच्या सामाजिक दायित्व निधीतून सूक्ष्म आणि ठिबक सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे शिवनेरी गडावरील प्रत्येक थेंबाचा शाश्वत वापर होणार आहे. हि देवराई इतर किल्ल्यांचा संवर्धनासाठी मार्गदर्शक ठरेल असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

## जीवनदानी विद्यावर्धिनी हिंदी इंग्लिश ...

असते व पालकांनी विद्यार्थ्यांवर वेळोवेळी लक्ष देऊन त्यांच्या मित्र-मैत्रिणींची माहिती ठेवणे आवश्यक आहे. पालकांनी मोबाईलपासून मुलांना जेवढे जास्तीत जास्त होईल तेवढे दुर ठेवण्याचा प्रयत्न करावा. मुलांना शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, अशा शब्दांत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जीवनदानी विद्यावर्धिनी हिंदी हायस्कूलने मला बोलावून मुलांना मार्गदर्शन करण्याची संधी दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी असल्याचे सांगितले. त्यानंतर मुख्याध्यापक म्हणाले की, गुरू आपल्या शिष्यांना आपल्यापेक्षा श्रेष्ठ बनवण्यासाठी ते नेहमी सर्वोच्च ज्ञान देतात जेणेकरून भविष्यात ते गुरू-शिष्य म्हणून ओळखले जातील. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष पं.जगदीश शास्त्री, हितचिंतक शिवरतन गग्गड यांचेही विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर भाषणे झाली. प्राचार्य डॉ.शशीकुमार पांडे यांनी शाळेचा वार्षिक सोहळा यशस्वी केल्याबद्दल शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांचे आभार मानले आहेत.

## नमो महारोजगार मेळाव्यातील नारीशक्ती...

ही व्यक्तीपरत्वे वेगवेगळी असते. आपल्या गरजेप्रमाणे तिचा शोध घेऊन उपयोग केला पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.यावेळी डॉ. लोढे म्हणाल्या, महिलांनी डिजिटल साक्षर होण्यावर भर दिला. डिजिटल क्षेत्रात वेगवेगळ्या कामाच्या संधी उपलब्ध होत आहेत. जसे बऱ्याच महिला आपल्या उद्योगाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी युट्यूब चॅनल, वेबसाईट यासारख्या माध्यमांचा वापर करतात. ज्यातून त्यांच्या उत्पादनांसाठी व्यापक बाजारपेठ मिळते. त्यातून आर्थिक उत्पन्नात भर पडण्यास मदत होते. नारीशक्ती परिसंवादात महिलांच्या करिअर संधीवर चर्चा होऊन सहभागी महिलांनी आपल्या व्यावसाईक वाटचालीतील संधी, आव्हाने व त्यांचा सामना कसा केला, याविषयी अनुभव यावेळी सांगितले.

## शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी...

नारायण मानकर, प्रविण शेट्टी माजी महापौर, अशोक पाटील- प. स. सदस्य, हार्दिक राऊत माजी. नगरसेवक, कोकण कृषी विद्यापीठ पदाधिकारी, ठाणे जि. बॅक संचालक, आजी - माजी जि. परिषद सभापती, पं. समिती सदस्य, तसेच पालघर जिल्ह्यातील बहुसंख्येने शेतकरी, तसेच लाभार्थी, प्रगतशील शेतकरी, मोठ्या संख्येने उपस्थित होते. लाभार्थी यांना मान्यवर यांच्या हस्ते साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी भरविण्यात आलेल्या कृषी प्रदर्शनात नारळ, खजूर, केळी, हळद, बांबूंच्या विविध वस्तू, शेती अवजारे, विविध कंदमुळे, विविध प्रकारचे पशु, आदींचा समावेश या कृषी प्रदर्शनास करण्यात आलेला. या प्रदर्शनातील ठेवण्यात आलेल्या वस्तू, रोपे, साहित्य आदीं पाहून शेतकरी यांना आधुनिक काळातील शेती याबद्दल अनेक माहिती उपलब्ध झाली. मा. राजेश पाटील आमदार बोईसर विधानसभा, यांनी लाभार्थी शेतकऱ्यांना साहित्य वाटप करताना, योग्य मार्गदर्शन करीत सांगितले. शेतकरी यांच्या शेती उत्पन्नात वाढ व्हावी हा हेतू ठेवून अशा शेतकरी मेळाव्याची आयोजन करण्यात आले होते. सेंद्रिय शेती भाजीपाला व फळबाग शेतीचे व्यवस्थापन साठवणुकीचे आधुनिक तंत्रज्ञान, पशुसंवर्धन योजना माहिती. तसेच कृषी क्षेत्राशी निगडित अनेक गोष्टींचा मेळाव्यात सहभाग असतो. शेतकरी बांधवांनी शेती विचारवंतांचे मार्गदर्शन घेऊन आपली शेती उत्तम दर्जाची करतील, असा विश्वास आमदारांनी यावेळी व्यक्त केला.

## केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी...

खासदार प्रतापराव चिखलीकर यांनी आभार मानले. श्री गडकरी यांनी समर्पित केलेल्या प्रकल्पांमध्ये खालील रस्त्यांवर चौपदरीकरण आणि दुपदरी रस्त्यांच्या बांधकामाचा समावेश आहे औसा ते चाकूर राष्ट्रीय महामार्गावरील ५८.५१ किमी लांबीचा काँक्रीट रस्ता रु. १५७२ कोटी. चाकूर ते लोहा राष्ट्रीय महामार्गावरील ७३.३५ किमी लांबीचा काँक्रीट रस्ता रु. २०२३ कोटी. आष्टामोड ते आष्टा आणि टिवटग्याळ ते मलकापूर (उदगीर) राष्ट्रीय महामार्गवरील रस्त्याचे पेव्हड शोल्डर सहित दुपदरीकरण ८२ कोटी रुपयांचा ५.८२ किमी श्री गडकरी यांनी खालील प्रकल्पांची पायाभरणीही केली. राष्ट्रीय महामार्ग ७५२घ वरील कोपरा ते घारोळा २६ किमी रस्त्याची सुधारणा रु. १३९ कोटी राष्ट्रीय महामार्ग ६३ वरील खारोळा पाटी ते बामणी ६.४ किमी लांबीचा रस्त्याची सुधारणा रू ३५ कोटी रा. म. ६३ वरील बोरगांव काळे ते मुरुड अकोला आणि लातूर विमानतळ जंक्शन ते महिला तंत्रनिकेतन १९.५ किमी रस्त्याची सुधारणा रू ९५ कोटी यावेळी कार्यक्रमासाठी क्रिडा, युवा कल्याण व बंदरे मंत्री संजय बनसोडे, खासदार सुधाकर श्रृंगारे, खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार रमेश कराड, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार बाबासाहेब पाटील, आमदार अभिमन्यू पवार, एनएचएआय चे तांत्रिक सल्लागार बाळासाहेब थेंग, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, एनएचएआय चे प्रादेशिक अधिकारी संतोष शेलार, प्रशांत देगडे, प्रकल्प संचालक स्वप्नील कासार आणि अभियंता कृष्णा माने आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आशिष आसाटी यांनी केले. सूत्रसंचालन रेणूका देशकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी व कारंजा-मानोरा चे आमदार राजेंद्र पाटणी यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. तसेच यावेळी धाराशिव जिल्ह्यातील १२२.९ कोटी रुपयांच्या ३ राष्ट्रीय महामार्गाचे प्रकल्पांचे भूमिपूजन ऑनलाईन करण्यात आले. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील, नीती आयोगाचे क्षमता बांधणी सल्लागार प्रवीणसिंह परदेशी, जिल्हाधिकारी डॉ सचिन ओंबासे, पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी आणि प्रकल्प संचालक संजय कदम कार्यक्रमस्थळी उपस्थित होते.

क्राईम संध्या | रविवार दि. २५ फेब्रुवारी २०२४ ते रविवार दि. ०३ मार्च २०२४ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ७

# देवणी तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते शरदचंद्र पवार साहेबांच्या विचारांचे - बस्वराज पाटील नागराळकर

**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील शरदचंद्रजी पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांची तालुका कार्यक्रत्यांची बैठक व नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा सत्कार समारंभ देवणी येथील संगमेश्वर मंगल कार्यालयात घेण्यात आला ही बैठक मोठ्या उत्साहात पार पडली बैठकीच्या अध्यक्ष स्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस बस्वराज पाटील नागराळकर होते. बसवराज पाटील नागराळकर यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की आजतागायत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकत देवणी तालुक्यात कमी होती म्हणून दुसऱ्या पक्षातील लोक राष्ट्रवादी काँग्रेसला चार खांदे करी व एक गाडगे धरी म्हणून म्हणून हिनवत होते परंतु शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकत मोठ्या प्रमाणात वाढली आहे देवणी तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते शरदचंद्र पवार यांच्या विचारांचे खांदे करी झाले आहेत त्यामुळे देवणी तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकत मोठ्या प्रमाणात वाढली आहे निलंगा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला चांगले दिवस येणार आहेत डॉ.बापूसाहेब पाटील उजेडकर यांनी निलंगा मतदारसंघ




राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडवून घेऊन निलंगा विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करावे असेही बस्वराज पाटील नागराळकर यांनी या प्रसंगी व्यक्त केले या दिवशी नवनियुक्त जिल्हाकार्याध्यक्ष डॉ बापूसाहेब पाटील उजेड कर यांचा वाढदिवसअसल्याने या बैठकीत वाढदिवस साजरा करण्यात आला पक्षाच्या वतीने त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाध्यक्ष संजय शेटे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते माजी आ. शिवराज तोंडचीरकर, जिल्हाध्यक्ष जिल्हा, कार्यध्यक्ष डॉ बापूसाहेब पाटील उजेडकर, रशीद शेख, जिल्हा कार्याध्यक्ष माजी सभापती, प्रा शिवाजी मुळे, प्रदेश कार्यकारणी सदस्य रघुनाथराव उचेकर सौ रेखाताई कदम जिल्हा महिला अध्यक्ष स्नेहाताई जिल्हा अध्यक्ष युती, भरत सूर्यवंशी युवक जिल्हाध्यक्ष, इस्माईल लदाफ, इत्यादी मान्यवरांची समयोचित भाषणे झाली बैठककीचे आयोजन माजी प्राचार्य तथा अल्पसंख्याक सेल चे प्रदेश महासचिव फकीर बुद्रे,अंकुश गायकवाड, अमर मुरके, व्यंकट बिरादार, प्रताप बिरादार, इंद्रिस भातांबरे शिवाजी बिबीनवरे सोमनाथ रावळे, संदीप पाटील देवणी कर फेरोज शेख हकीम बौडीवाले हसन मोमीन संतोष बोचरे शोभा बेळे, इंदुमती पाटील संतोष बिरादार विवेक बिरादार गणपत कांबळे, नितीन बिरादार, ज्ञानोबा सूर्यवंशी, सचिन गवळी, धनाजी कोयले, परमेश्वर बोरोळे, उद्धव अचवले यांनी केले होते या बैठकीला तालुक्यातील शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे समर्थक बहुसंख्येने उपस्थित होते. आभार प्रताप बिरादार यांनी मानले.

# भोगवटा वर्ग दोनच्या जमिनीचे हस्तांतरण रोखा अन्यथा उपोषणाचा दिला इशारा




**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यात वर्ग दोनच्या जमिनी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत स्थानिक जमीन माफिया यांचा त्याच्यावर डोळा ठेऊन त्या जमिनी घशात घातल्या जात आहेत. दुय्यम निबंधक कार्यालयांना हाताशी धरून अवैद्य मार्गाने व्यवहार केले जात आहेत. वर्ग दोन च्या जमिनी हस्तांतरण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांची रीतसर परवानगी घेउन आवश्यक तेवढे शुल्क भरावे लागतात. त्यासाठी आवश्यक असणारे चलन भरावे लागते. मात्र दुय्यम निबंधक कार्यालयाला हाताशी धरून नियम बाजूला सारले जात आहेत. दुय्यम निबंधक व जमिनी माफिया यांच्यात असणारे साठेलोटे करण्याचे काम दलालामार्फत केले जाते. याचा फटका सर्वसामान्य मालकी जमिनीच्या मालकांना विक्रेत्यांना होत आहे. त्यांनी सांगितलेला आकडा कार्यालयात नाही मिळाला तर कोणतेही कारण सांगून सर्वसामान्यांचे व्यवहार रोखले जातात. आतापर्यंत अवैध मार्गाने विनापरवानगीने झालेले सर्व व्यवहार नोंद, दस्त नोंद, रद्द करण्यात यावेत. तसेच सदरच्या जमिनीवर शासकीय कार्यालय क्रीडा संकुलन, कर्मचारी निवास, औद्योगिक वसाहत या साठी ते वापरल्या जाव्यात या मागणीसाठी अनेकदा माननीय जिल्हाधिकारी जिल्हा नोंदणी शुल्क अधिकारी दस्त नोंद लातूर यांच्याकडे रीतसर निवेदन देऊन सुद्धा अद्यापही त्या व्यवहारात कुठल्याही प्रकारचा बदल करण्यात आला नाही याबाबतची दखल घ्यावे अन्यथा दिनांक २७ फेब्रुवारी रोजी आमरण उपोषण करण्याचा इशारा पृथ्वीराज जीवने यांनी निदनाद्वारे दिला आहे या निवेदनावर श्रीमंत लुल्ले,योगेश तगरखेडे, करीम शेख, भगवान पाटील बिरादार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. सदरच्या निवेदनाच्या प्रती जिल्हा निबंध कार्यालय श्रेणी एक, तहसीलदार देवणी, दुय्यम निबंध कार्यालय देवणी यांना देण्यात आले आहेत.

# शेतकऱ्यांचे माहिती व जनसंपर्क आणि प्रात्यक्षिक शिबिर संपन्न




**पालघर/प्रतिनिधी**

जिल्हा परिषद पालघर, पंचायत समिती वाडा, कृषि व पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी दोन दिवसीय शिबिर प्रात्यक्षिके माहिती, प्रशिक्षण व जनसंपर्क जनसंपर्क शिबिर सन २०२३-२४ चे वाडा तालुक्यातील शिलोत्तर येथे संपन्न झाले आहे. या शिबिरात जिल्हा परिषद पालघरचे कृषि व पशुसंवर्धन समिती सभापती संदिप पावडे उपस्थित राहून शेतकरी व पशुपालकांना मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी पशुपालन करून शेतीचा विकास साधला पाहिजे, असे सांगून शासनाच्या योजनाबाबत महिती दिली. शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त योजनांचा लाभ घेतला पाहिजे असे सांगितले. शेती अत्याधुनिक यांत्रिकीकरणाचा वापर करून सेंद्रिय शेती करावी, असे आवाहन केले. यावेळी जिल्हा परिषद पालघरच्या महिला व बालविकास सभापती रोहिणी शेलार, पंचायत समिती वाडाच्या सभापती अस्मिता लहांगे, कृषि भूषण सन्मनित प्रगतिशील शेतकरी अनिल पाटील, जिल्हा परिषद सदस्या भक्ती वलटे, मिताली बागुल, तसेच पंचायत समिती वाडाचे माजी सभापती रघुनाथ माळी, योगेश गवा, अमोल पाटील पंचायत समिती सदस्य सुचिता पराड, गटविकास अधिकारी खताळ, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.प्रकाश हसनाळकर, तालुका कृषि अधिकारी पारधी, पंचायत समिती कृषि अधिकारी संदेश दुमाडा, विनीत गोंदके, पशुधन विकास अधिकारी डॉक्टर आसवले, प्रतिष्ठित शेतकरी ग्रामस्थ तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अवैध्य रेती उत्खनन करणारा सक्शन पंप केला नष्ट, भिवंडी महसूल प्रशासनाची कारवाई

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी व ठाणे तालुक्याच्या सीमेवरील उल्हास नदी व ठाणे खाडी पात्राता अवैध्य रेती उत्खनन सुरू असल्याच्या तक्रारी वाढल्याने ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या आदेशाने भिवंडी उपविभागीय अधिकारी अमित सानप व तहसीलदार अभिजित खोले यांच्या मार्गदर्शना खाली काल्हेर ते वेहेळे कोन येथील खाडीपात्रात भिवंडी अपर मंडळ अधिकारी अतुल नाईक व खारबाव मंडळ अधिकारी सुधाकर कामडी यांच्या नेतृत्वाखाली पथकाने केलेल्या कारवाईत खाडी पात्रता एक बार्ज व एक संकशन पंप आढळून आले. कारवाई पथकाची चाहूल लागताच बार्ज वरील कामगारांनी पाण्यात उडी मारून ते पसार झाले. परंतु पलायन करण्यापूर्वी त्यांनी बार्ज चा वॉल काढल्याने त्यात पाणी शिरले व अशा परिस्थितीत बोटीच्या सहाय्याने बार्ज ओढून आणने शक्य नसल्याने तो तिथेच बुडवण्यात आला. तर सक्शन पंप बोटीच्या साहाय्याने काल्हेर बंदर येथील खाडी किनारी पाण्याबाहेर काढून त्याचा पुन्हा वापर होऊ नये म्हणून गॅस




कटर च्या सहाय्याने कापून नष्ट करण्यात आला आहे. या कारवाईत एकूण १४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला असून पुढील गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया नारापोली पोलिस ठाणे येथे सुरू असल्याची माहिती भिवंडी तहसील कार्यालयातील महसूल प्रशासनाने दिली आहे.




# शिवजयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम

**वाडा/प्रतिनिधी**

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) मर्यादित पुणे व महाराष्ट्र बम्हज्ञान मंडळ (एम्केसीएल) यांच्या संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमा अंतर्गत मल्टिटेक इन्स्टीट्यूट वाडा ऑफ कॉम्प्युटर सायन्स या शासनमान्य संगणक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने शिवजयंतीचे औचित्य साधून वाडे शहरात व ग्रामीण रुग्णालय येथे अनेक विद्यार्थीच्या उपस्थितीत स्वच्छता मोहिम राबवण्यात आली. सदर मोहिमेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला व शहर स्वच्छ केले.

# डोक्यात विटा पडून ६५ वर्षीय सुरक्षा रक्षकाचा मृत्यू, गुन्हा दाखल

**मुंबई/प्रतिनिधी**

दहिसर पश्चिम येथे डोक्यात विटा पडून ६५ वर्षीय सुरक्षा रक्षकाचा मृत्यू झाला. याप्रकरणी इमारतीच्या नूतनीकरणाचे काम घेतलेल्या कंपनीच्या मुकादमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उद्वाहनातून विटा घेऊन जात असताना त्या सुरक्षा रक्षकाच्या डोक्यात पडल्या. पुढे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. दहिसर येथे वास्तव्यास असलेले शरद आंब्रे (६५) याच परिसरातील एका इमारतीत सुरक्षा रक्षक म्हणून गेली पाच वर्षे काम करीत होते. तेथील नोकरी सुटल्यानंतर आंब्रे डायमंड इंडस्ट्रीयल इस्टेट प्रिमायसेस येथे गेल्या १५ दिवसांपासून काम करीत होते. आंब्रे यांनी मुलाला नोकली लावण्यासाठी सोमवारी इमारतीजवळ बोलावले होते. मुलगा तेथे पोहोचला असता त्याला डायमंड इंडस्ट्रीलय इस्टेट प्रिमायसेस कॉ. हाऊसिंग सोसायटी येथे गर्दी दिसली. जवळ जाऊन पाहिले असता त्याला शरद आंब्रे बेशुद्धावस्थेत पडल्याचे निदर्शनास आले. त्यांच्या कान आणि नाकातून रक्त येत होते. नूतनीकरणासाठी उद्वाहनातून विटा घेऊन जात असताना त्या आंब्रे यांच्या डोक्यात पडल्या. त्यामुळे ते जखमी झाले. त्यानंतर मुलाने तत्काळ एस. व्ही. रोड येथील समर्पण रुग्णालयात वडिलांना उपचारासाठी दाखल केले. सायंकाळी उपचारादरम्यान शरद आंब्रे यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी मुलाच्या तक्रारीवरून नूतनीकरणाचे काम करणारा कंपनीचा मुकादम नसीम शेख यांच्याविरोधात दहिसर पोलिसांनी हलगर्जीपणाचा गुन्हा दाखल केला.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**ई-निविदा सूचना क्रमांक १९८ सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पालघर बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी, पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता 'ब-१' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०५ (पाच) काम समाविष्ट आहे.

टिप : या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.gov.in 2) http://mahatenders.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये (जी.एस.टी.वगळून) | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | जे.डी.एस. स्कूल ते संदरम स्कूलपर्यंत रस्ता तयार करणे. ता. पालघर, जि. पालघर | रु. २८,९०,८३७/- | ३४५२ पर्यटन |
| २. | शिरगाव खडकीपाडा रस्ता काँक्रिटीकरण करणे. ता.जि. पालघर | रु. २०,७०,८१८/- | ३४५२ पर्यटन |
| ३. | पालघर तालुक्यातील शिरगाव समुद्र किनारी जॉगिंग ट्रॅक तयार करणे. ता.जि. पालघर | रु. १६,४७,३३८/- | ३४५२ पर्यटन |
| ४. | पालघर तालुक्यातील शिरगाव समुद्र किनारी (स्वाध्यायचा प्लॉट) गार्डन तयार करणे. ता.जि. पालघर | रु. १६,६३,२८३/- | ३४५२ पर्यटन |
| ५. | पालघर तालुक्यातील माहिम (सर्वे नं. ९२३) माहिम रोड ते वाया प्लॉट नं.१६ गिरनार अपार्टमेंट पर्यंत रस्ता तयार करणे. ता.जि.पालघर | रु. १२,३८,१२६/- | ३४५२ पर्यटन |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

वरील कामाची ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. २३/०२/२०२४ ते दि. ०१/०३/२०२४ पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. ०४/०३/२०२१४ शक्य झाल्यास सकाळी ११.०० नंतर

**जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/२१५७**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी, पालघर-बोईसर रोड,
ता.जि. पालघर (पश्चिम) - ४०१ ४०४,
दिनांक : २२/०२/२०२४

सही/-
(स.प्र. पाटील)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर

**विमाका/कोवि/२०२३-२०२४/४१४**



**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**निविदा सूचना क्रमांक -२०१ सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, पालघर हे खालील कामाच्या बी-१ नमुन्यातील सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील **नोंदणीकृत कंत्राटदार** यांच्याकडून मागवित आहेत. कोरे निविदा संच निविदा उपलब्ध कालावधी दिनांक २३/०२/२०२४ ते दिनांक ०१/०३/२०२४ सकाळी ११.०० ते संध्या. ५.४५ वाजेपर्यंत (www.mahapwd.gov.in) या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर हे भरून पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

टिप : सदर निविदा सूचनेमध्ये एकूण १२ (बारा) काम समाविष्ट आहेत. या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.gov.in 2) http://www.paytopwd.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष (जी.एस.टी.) वगळून | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | आंबिवली डोंगरशेतपाडा रस्त्याचे मजबुतीकरण करणे. ग्रा.मा. २९४ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७८१५९४/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| २. | वाढणे चव्हाणपाडा रस्त्यावर संरक्षण भिंत बांधणे. ग्रा.मा. ३५६ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७७७५८९/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ३. | रायतळी नाईकपाडा रस्त्यावर संरक्षण भिंत बांधणे. ग्रा.मा. ३५६ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७८७८३८/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ४. | देहाळे गेटीपाडा रस्ता सुधारणा करणे. ग्रा.मा. ४२३ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७७०८०७/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ५. | घोळ ते चिकनपाडा रस्ता सुधारणा करणे. ग्रा.मा. ३९८ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७८८३०१/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ६. | मुरबाड धांगडपाडा रस्त्यावर संरक्षण भिंत बांधणे. ग्रा.मा. ३८८ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७८७१४५/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ७. | मुरबाड कासटपाडा रस्त्यावर संरक्षण भिंत बांधणे. ग्रा.मा. ३८७ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७७६८७०/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ८. | ओसरविरा कोरडापाड रस्ता सुधारणा करणे. ग्रा.मा. ५४३ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७९५५८८/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ९. | देहाळे पाटीलपाडा रस्त्यावर संरक्षण भिंत बांधणे. ग्रा.मा. ४९४ ता. डहाणू, जि. पालघर | ७८१५३५/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| १०. | खानिव कातकरीपाडा रस्ता सुधारणा करणे. ग्रा.मा. ५१७ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७९५३२८/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ११. | खानिव खडकीपाडा रस्ता सुधारणा करणे. ग्रा.मा. ३७६ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७९५३२८/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| १२. | रायतळी शेतावरचापाडा रस्ता सुधारणा करणे. ग्रा.मा. ५७७ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७८५३२४/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

निविदा उपलब्ध कालावधी - दि. २३/०२/२०२४ ते दि. ०१/०३/२०२४ पर्यंत

निविदा उघडणे - दि. ०२/०३/२०२४ दुपारी ०३.०० नंतर शक्य झाल्या.

**जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/२२१६**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी
पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम) ४०१ ४०४
दिनांक : २२/०२/२०२४

**सही/-**
**(स.प्र. पाटील)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर**

**विमाका/कोवि/२०२३-२०२४/४१७**

25 FEBRUARY TO 03 MARCH 2024 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 2/24/2024 8:37 PM Page 1



# गडकोट, किल्ले हा आपला ठेवा; तो जपण्याचे काम करू-मुख्यमंत्री

## 'शिवाई देवराई' आणि वन उद्यानाचे लोकार्पण




**पुणे/प्रतिनीधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत किल्ले शिवनेरी येथे शिवाई देवराई' आणि वन उद्यानाचे लोकार्पण करण्यात आले. शिवनेरी संवर्धन आणि विकास प्रकल्पांतर्गत वन विभागाच्यावतीने किल्ले शिवनेरीवर अडीच एकर क्षेत्रावर तीन वनोद्यान व स्वतंत्र 'शिवाई देवराई' विकसित करण्यात आली आहे. देवराईची संकल्पना सह्याद्री गिरीभ्रमण संस्थेची असून संस्थेच्या माध्यमातून जैन इरिगेशनच्या सामाजिक दायित्व निधीतून सूक्ष्म आणि ठिबक सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे शिवनेरी गडावरील प्रत्येक थेंबाचा शाश्वत वापर होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकोट किल्ले हे आपला ठेवा असून तो जपण्याचा प्रयत्न नक्की करू. पहिल्या टप्प्यात शिवाजी महाराजांशी संबंधित विविध २० पर्यटन स्थळे विकसित होत आहेत, त्यात किल्ले रायगडाप्रमाणेच शिवनेरीचाही विकास करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, खासदार अमोल कोल्हे, आमदार अतुल बेनके, माजी खासदार तथा म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, माजी आमदार शरद सोनवणे, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य आशाताई बुचके, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, मुख्य वनसंरक्षक एन. आर. प्रवीण, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक, पंकज देशमुख, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी वास्तुकला, अभियांत्रिकी, किल्ल्यावरील प्रत्येक थेंब पाण्याचा उपयोग करून घेण्याची दूरदृष्टी त्या काळी दाखवली. शिवछत्रपती म्हणजे पराक्रम, शौर्य, त्याग, समर्पण आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व होते. ते सर्वव्यापी होते आणि त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन काम केले. ते युगपुरुष, युगप्रवर्तक आणि रयतेचे राजे होते. अठरापगड जातीचे, धर्माचे लोक त्यांनी एकत्र आणले. प्रजेच्या दुःखापुढे, कल्याणापुढे स्वतःचे दुःख, आराम कवडीमोल मानला. त्यांनी तलवार हाती घेतली पण निष्पापांच्या रक्ताने रंगू दिली नाही. ...पान ६ वर

# जीवदानी विद्यावर्धिनी हिंदी - इंग्लिश हायस्कूलचा ३२वा वार्षिक सोहळा संपन्न



**विरार/प्रतिनिधी**

विरार ज्योती-कलश एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई संचलित जीवदानी विद्यावर्धिनी हिंदी हायस्कूलचा ३२ वा वार्षिक सोहळा गुरुवारी अण्णासाहेब वर्तक हॉल, रेल्वे स्टेशनजवळ, विरार (पुर्व) येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मुख्य अतिथी म्हणून वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार, विरार पोलीस ठाणे, फुलवारी समाचार वृत्तपत्राचे वरिष्ठ संपादक रमेश पटेल, मा. नगरसेविका विलासबंधू चोरघे, समाजसेविका प्रतिभा नरेंद्र पाटील, साहित्यिक अॅड. नयन जैन, क्राइम संध्या वृत्तपत्राचे संपादक-मालक लक्ष्मणराव पाटोळे, ज्येष्ठ साहित्यिक दिनेश वैशवरी, राजीव गांधी हायस्कूल, मोरेगाव-नालासोपारा बंशीधर शर्मा, सरचिटणीस-शास्त्री शैक्षणिक संस्था विरार सुरेद्रनाथसिंह वसई, चाइल्ड हार्ट फाउंडेशनचे संदीप सिंग तसेच पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी मुलांना संबोधित करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणाले की, शाळेतून शिक्षणाच्या रूपाने जे ध्येय प्राप्त होते ते साध्य करण्यासाठी नेहमी साधना आणि एकाग्रतेची गरज ...पान ६ वर

# मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात ९४५ नवीन पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती



**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

पोलीस भरती प्रक्रियेतून निवड करण्यात आलेले ९४५ पोलीस कर्मचारी मिरा भाईदर आणि वसई विरारमधील विविध पोलीस ठाण्यात रुजू झाले आहे. यामुळे अपुऱ्या पोलीस बळाची अडचण दूर झाली आहे. सर्वाधिक पोलीस हे पेल्हार आणि नालासोपारा पोलीस ठाण्यात मिळाले आहेत. तर मुख्यालयात २०० पोलीस नियुक्त करण्यात आले आहे. मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या स्थापनेपासून अपुऱ्या मनुष्यबळाची समस्या भेडसावत होती. त्यासाठी मागील वर्षी ९९६ पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती. या भरती प्रक्रियेत निवड झालेल्या उमेदवारांचे ९ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर हे पोलीस विविध पोलीस ठाणी, मुख्यालय, वाहतूक शाखा आणि गुन्हे शाखेत नियुक्त करण्यात आले आहेत. एकूण ९४५ पोलीस कर्मचारी विविध पोलीस ठाण्यात नियुक्त करण्यात आले असून त्यात ३०३ महिला पोलीस कर्मचारी आहेत. परिमंडळ १ मध्ये काशिमिरा (३१), मीरा रोड (२५), प्रस्तावित काशिगाव (३९), भाईंदर (३७), उत्तन (२८), नवघर (३०) आणि नया नगर मध्ये (४७) पोलिसांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. परिंडळ २ आणि ३ मध्ये वसई (३०), माणिकपूर (१७), नायगाव (३४), तुळींज (३४), वालीव (३६), आचोळे (३३), पेल्हार (५५) विरार (३८) मांडवी (२०) नालासोपारा (५१) आणि मांडवी (३२) पोलिसांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. याशिवाय गुन्हे शाखेत २५, वाहतूक विभागात ५०, मोटर वाहन विभागात २५ पोलिसांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. २१८ पोलीस हे मुख्यालयातील विविध विभागात काम पाहणार आहेत. या नव्या पोलिसांच्या नियुक्त्यांमुळे पोलिसांचे बळ वाढणार असून आगामी लोकसभा, विधानसभा आणि त्या पाठोपाठ होणाऱ्या पालिका निवडणुका हाताळणे पोलिसांना सोपे जाणार आहे.

# नमो महारोजगार मेळाव्यातील नारीशक्ती परिसंवाद उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी**

आज महिला प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवत असल्या तरी बऱ्याच महिलांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात, विशेषत: उद्योग व्यवसायाची आवड असूनही त्यात पुढे जाता येत नाही. तेंव्हा महिलांनी उद्योगात यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वास आणि कष्ट करण्याची तयारी ठेवल्यास आणि योग्य नियोजनासह पाऊल पुढे टाकल्यास त्या त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात, उद्योगात यशस्वी होऊ शकतात, असा सूर नमो महारोजगार मेळाव्यात आयोजित 'नारीशक्ती' परिसंवादात उमटला. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्यावतीने आयोजित विभागीय नमो महारोजगार मेळावा आज येथील निवासी महिला तंत्रनिकेतन समोरील मैदानात आयोजित करण्यात आला होता. यावेळी झालेल्या नारी शक्ती परिसंवादात विविध क्षेत्रात ठसा उमटवलेल्या यशस्वी महिलांनी संवाद साधला.यावेळी परिसंवाद ऐकण्यासाठी आमदार संभाजी पाटील निलंगेकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, प्रशिक्षणार्थी सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, नगरपालिका प्रशासनचे सहआयुक्त रामदास कोकरे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व युवती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या परिसंवादात उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, सामाजिक कार्यकर्त्या प्रेरणा होनराव, लातूर मधील कौशल्य कडमीच्या संचालिका वैशाली देशमुख, नव्व्या फॅशन डिझायनींगच्या वसुधा माने, राजर्षी शाहू कॉलेजच्या प्राध्यापिका डॉ. रेणूका लोंढे, नांदेड येथील कौशल्य उद्योजकता विभागाच्या सहायक आयुक्त रेणुका तम्मलवार, उद्योजिका साधना देशमुख, शांतकमल पोळी भाजी केंद्राच्या संचालिका रुपाली देशपांडे यांचा सहभाग होता. यावेळी दयानंद कला महाविद्यालयातील प्रा. अंजली जोशी टेंभुर्णीकर यांनी परिसंवादात निवेदिकेची भूमिका पार पाडली.उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ म्हणाल्या की, घरातील सर्वजण शिक्षण क्षेत्रात होते, परंतु त्यांना प्रशासनात काम करण्याची आवड होती. त्यादृष्टीने मेहनत घेतली व यामध्ये वडिलांनीही पाठिंबा दिला. त्यामुळे त्या आज या पदावर काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर संधी ...पान ६ वर

### विरार येथे शेतकरी मेळावा व प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

# शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत -राजीव पाटील



**पालघर/एच.लोखंडे**

डॉ. बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठ (दापोली), महाराष्ट्र राज्य कृषी विभाग व ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँक यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक २२ फेब्रुवारी २०२३ रोजी, जीवदान मंदिर संस्थेच्या सभागृह, विरार पूर्व ता. वसई जि. पालघर येथे शेतकरी मेळावा, प्रगतीशील शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम, कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात आलेला. कार्यक्रमाचे उद्‌घाटक व अध्यक्ष राजीव पाटील (वसई-विरार महापालिकेचे प्रथम महापौर) यांनी कार्यक्रमासाठी आलेल्या शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करतांना सांगितले. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी ज्या काही उपाययोजना करता येतील त्या करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. शेतकरी यांना आर्थिक फायदा कसा होईल. यासाठी शेती शास्त्रज्ञ यांचे मार्गदर्शन घेऊन, शेतकरी बांधवांनी आता, शेतीविषयक नव नवीन प्रयोग करून शेतकरी यांनी आपले उत्पन्न वाढवावे. तसेच पालघर जिल्ह्यात कृषी संशोधन केंद्र उभारण्यासाठी लागणारी जागेची सुध्दा उपलब्धता करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. मान्यवर म्हणून हितेंद्र ठाकूर (आमदार), सुनील भुसारा (आमदार), क्षितिज ठाकूर (आमदार), राजेश पाटील (आमदार), निखिल डावखरे (आमदार), प्रकाश निकम अध्यक्ष जि. प. पालघर, राजेंद्र पाटील-ठाणे जि. बँक, विनायक काशिद-महा. कृषी शिक्षण व संशोधन परिषद सदस्य, ...पान ६ वर

# तो आधी रिक्षा चोरायचा मग भाड्याने चालवायला द्यायचा; पोलिसांनी केली अटक

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

मिरा भाईंदरसह मुंबई, ठाणे व वसई विरार परिसरातून रिक्षा चोरणार्या व नंतर त्या भाड्याने चालवायला देणार्या आरोपीला मध्यवर्ती गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्याच्याकडून चोरी केलेल्या ९ रिक्षा व दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. भाईंदर पश्चिम येथील राई पुला जवळून रिक्षा चोरी झाल्याची तक्रार भाईंदर पोलीस ठाण्यात दाखल झाली ओती. मिरा भाईंदर व वसई विरार भागात वाहन चोरीचे प्रमाण वाढत असल्याने या गुन्हयाचा समांतर तपास मध्यवती गुन्हे शाखाही करत होती. एक इसम विरार पूर्व येथील रामु कम्पाऊन्ड, अंबा मंदीराच्या पाठीमागे चोरीच्या रिक्षा व दुचाकी आणून त्याचे भाग वेगळे करुन विकत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. त्यानंतर पोलीसांनी सापळा रचला असता अश्रफ ऊर्फ सलमान मंहमद परवेज शेख हा रिक्षेसोबत छेड छाड करीत असल्याचे दिसून आले. ताब्यात घेवुन आश्रफला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली असता त्याने भाईंदर येथून रिक्षा चोरी केल्याचे कबूल केले. त्याच्याकडे अधिक तपास केला असता त्याने ९ रिक्षा व २ दुचाकी साथीदाराच्या मदतीने चोरल्या असल्याचे पोलीसांना सांगितले. विशेष म्हणजे रिक्षा चोरी केल्यानंतर अश्रफ त्याचा क्रमांक बदलत असे व नंतर ती भाड्याने चालवायला देत असे अशी माहिती पोलीसांनी दिली. पोलीसांनी त्याच्याकडून ९ रिक्षा, २ मोटर सायकल व मोबाईल फोन असा एकूण ६,८८,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

# वसईच्या अमिशा दळवीचे राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल यश



**वसई/प्रतिनिधी**

वसई येथील अमिशा प्रवीण दळवी या विद्यार्थिनीने विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या प्राध्यापकांसाठीच्या राष्ट्रीय पात्रता चाचणी परीक्षेत लाइफ सायन्स या विषयात ९६.६३ गुण संपादन करून कनिष्ठ संशोधन अभ्यासवृत्तीसह राष्ट्रीय पातळीवर ८५ वा क्रमांक पटकावला आहे. वसईच्या अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी असलेल्या अमिशा दळवी हिच्या या उज्ज्वल यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरविंद उबाळे यांच्या हस्ते तिचा नुकताच सत्कार करण्यात आला. अमिशाने आपले महाविद्यालयीन शिक्षण अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयातून पूर्ण केले असून तिने प्राणिशास्त्र या विषयात प्रथम क्रमांक पटकावत ९.३३ श्रेयांकांसह पदवी संपादन केली. तसेच पदव्युत्तर पदवी (MSc.) संपादन करतानाही विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावत ती सुवर्णपदकाची मानकरी ठरली असे प्राणीशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा.पी.एम. पगारे यांनी सांगितले. अमिशा दळवी हिच्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ.अरविंद उबाळे यांनी तिचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी तिला शुभेच्छा दिल्या. तसेच अशा गुणवंत विद्यार्थ्यांनी शिक्षकी पेशात यावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले, असे यशस्वी विद्यार्थी आपल्या कामगिरीमुळे विद्यार्थीवर्गाला प्रेरणादायी ठरतात असे ते म्हणाले.

# केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते अहमदपूर येथे १९० किमी लांबीच्या महामार्ग प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन!



**अहमदपूर/प्रतिनिधी**

१९० किमी लांबीच्या रु ३९४६ कोटींच्या महामार्ग प्रकल्पांचे लोकार्पण व भूमिपूजन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आज करण्यात आले. अहमदपूर येथील भकतस्थळ येथे आयोजित राष्ट्रीय महामार्गाचे लोकार्पण व भूमिपूजनच्या उदघाटनप्रसंगी गडकरी म्हणाले, विदर्भातील बुटीबोरी पासून कोकणापर्यंत मराठवाडा, पश्रि्चम महाराष्ट्रातून जाणारी नवीन लाईफ लाईन तयार झाली आहे. या रस्त्यामुळे कृषी उत्पादन बाजारपेठेला चालना मिळाली आहे. मागासलेल्या भागाच्या विकासासाठी या रस्त्याचा निश्रि्चत उपयोग होईल. नागपूर ते रत्नागिरी ९२० किमी लांबीच्या महामार्गासाठी ३० हजार कोटी रुपये खर्च केल्याचे त्यांनी सांगितले. श्री गडकरी म्हणाले महाराष्ट्रातील नांदेड येथील माहूरगड, तुळजापुर येथील तुळजाभवानी आणि कोल्हापुरातील महालक्ष्मी या तीन प्रमुख शक्तीपीठाना जोडणारा भक्ती मार्ग असणार आहे. जिल्ह्याची पाणी टंचाई दूर करण्यासाठी राष्ट्रीय महामार्गाच्या कामातून नांदगाव, सारोळा सह २२ ठिकाणी तलावाचे खोलीकरण करून १८.७२ लाख क्युबिक मीटर पाण्याचे स्टोरेज वाढवून जलसंवर्धन करण्यात आल्याचे श्री. गडकरी यांनी सांगितले. लातूर जिल्ह्यातील सर्व लोक प्रतिनिधींनी जलसंवर्धन कामाकडे लक्ष द्यावे अशी विनंति त्यांनी यावेळी केले. शेतकऱ्यांनी शेती समृध्द करण्यासाठीं बायोमास पासून डांबर, इथेनॉल तयार करण्याचे आवाहन श्री गडकरी यांनी केले. पुढील काळामध्ये विमानाचे हवाई इंधन निर्माता म्हणून शेतकरी बनावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. श्री गडकरी यांच्या नेतृत्वात मागील दहा वर्षात नांदेड व लातूर जिल्हयात महामार्गाच्या कामाचे विस्तार केल्याबद्दल क्रीडा मंत्री संजय बनसोडे, खासदार सुधाकर श्रृंगारे आणि ...पान ६ वर

